रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ६६ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५

किंमत ४ ₹


## ९ हजार ८४८ मेट्रिक टन खताचा पुरवठा

**रायगड :** जिल्ह्यात खरीप हंगामासाठी खताचा पुरवठा मुबलक प्रमाणात असून, जिल्ह्याला ११ हजार ९३१ मेट्रिक टन खत मंजूर झाले होते. यामधील ९ हजार ८४८ मेट्रिक टन खताचा पुरवठा जिल्ह्यात करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना खताचा पुरवठा वेळेत करण्यात येणार असल्याची माहिती, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे व कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजन यांनी दिली आहे.रायगड जिल्ह्यात खरीप हंगामात भात पिक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. सध्या भात पिकाच्या लावणीची कमी अंतिम टप्प्यात आहेत.

## भारतामध्ये सोरायसिसची वाढती समस्या!

**मुंबई :** त्वचेवरील लालसर, खरखरीत चट्टे आणि सततचा खाज-यामुळे ओळखला जाणारा सोरायसिस हा आजार भारतात वेगाने वाढत असल्याचे आरोग्य तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. भारतात सोरायसिसचे प्रचलन सुमारे ०.४ टक्के ते २.८ टक्के दरम्यान आहे. ग्रामीण भागात रुग्णसंख्या तुलनेने कमी असली तरी शहरी भागात, विशेषतः प्रदूषण, मानसिक ताण आणि जीवनशैलीतील बदल यामुळे हा आजार जास्त प्रमाणात दिसतो. सोरायसिसवर मात करण्यासाठी केवळ औषधोपचार नव्हे, तर जीवनशैलीतील बदल, मानसिक आरोग्याची काळजी, नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि तणाव नियोजन महत्त्वाचे असल्याचे तज्ज्ञांचे एकमत आहे.

# आता गणेशोत्सव मुख्यमंत्र्यांच्या घरी




## पाट पूजन करून लक्षवेधक आंदोलन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गाच्या गेल्या १५ वर्षातील रखडलेल्या रस्ते कामाविरोधात बळीराजा सेना आणि जनआक्रोश समितीच्या कार्यकर्त्यांनी रविवारी पनवेल येथील पळस्पे फाटा येथे गणपतीच्या पाटाचे विधिवत पूजन करून लक्षवेधक आंदोलन केले. धोकादायक महामार्गाचा अवलंब टाळावा, या सरकारला जाग यावी म्हणून कोकणात जाणाऱ्या महामार्गावर लांजा ते पनवेल या ठिकाणी दहा दिवस गणेशोत्सव साजरा केला जाणार आहे. अखेरच्या दिवशी मुख्यमंत्र्यांच्या मुंबई येथील वर्षा निवासस्थानालगत गणेशमूर्तीचे स्थापना करून सरकारचे लक्ष वेधले जाणार असल्याची घोषणा संतापलेल्या कार्यकर्त्यांनी रविवारी आंदोलन ठिकाणी केली.

गेल्या १५ वर्षात ४५३१ जणांनी मुंबई गोवा महामार्गावर विविध अपघातांमध्ये आपले प्राण गमावले. सरकारने ७०० किलोमीटरचा समुद्धी महामार्गाचे काम अवघ्या पाच वर्षात पूर्ण केले. मात्र मुंबई गोवा महामार्गाचे ४७१ किलोमीटरचे काम १६ वर्षे रखडल्याने बळीराजा सेना आणि जनआक्रोश समितीच्या कार्यकर्त्यांनी पळस्पे येथील आंदोलनातून संताप व्यक्त केला. महामार्गाच्या कामात भूसंपादनाचा अडथळा येत असल्याचे कारण पुढे करून कोकणाला बदनाम केले जात आहे. प्रत्येक गणेशोत्सवापूर्वी मंत्र्यांचे दौरे या महामार्गाच्या पाहणीसाठी केले जातात. मात्र हा निव्वळ दिखावा असल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला.कोकणात जाण्यासाठी पूर्वीचे अरुंद •> पान २ वर



(छायाचित्र : राजेश डांगळे)

### गणरायाला साकडे

नेते आणि ठेकेदार यांची मिलीभगत असल्याने हा महामार्ग रखडला आहे. सरकार आणि ठेकेदार यांच्याकडून महामार्गातील अपघाती बळी नव्हेतर हे त्यांच्या संगनमतातून होत असलेल्या हत्या आहेत. यापुढे अशा हत्या घडू नयेत, असे साकडे आंदोलनकर्त्यांनी गणरायाला घातले.

## वे|ध|क

### राज्यात पाऊस पुन्हा सक्रिय

**मुंबई :** मागील दोन तीन दिवसांपासून राज्यात पुन्हा पावसाने हजेरी लावली असून आजपासून पावसाचा जोर वाढणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यानुसार आज मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात विजांसह पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. जुलै महिन्यातील तीन चार दिवस वगळता फारसा पाऊस पडलेला नाही. त्यामुळे जुलै महिन्यात सामान्य पावसाची नोंद झाली. त्यानंतर ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यातही पावसाचा जोर नव्हता. मागील दोन तीन दिवसांपासून राज्यात पुन्हा पाऊस सक्रिय झाला आहे. मुंबईसह इतर भागात पाऊस पडत आहे.

### रॉबर्ट वाड्रांच्या अडचणी वाढल्या

**नवी दिल्ली :** प्रियांका गांधींचे पती रॉबर्ट वाड्रांच्या अडचणी वाढल्याचं दिसून येतं आहे. रॉबर्ट वाड्रांनी ५८ कोटींची बेकायदेशीर कमाई केली असा ठपका ईडीच्या आरोपपत्रात ठेवण्यात आला आहे. व्यावसायिक आणि प्रियांका गांधींचे पती रॉबर्ट वाड्रा यांनी ५८ कोटी रुपये बेकायदेशीर मार्गाने कमवले असा ठपका ठेवण्यात आला आहे. ५८ कोटींपैकी पाच कोटी रुपये ब्लू ब्रीज ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेडच्या मार्गाने आणि ५३ कोटी रुपये स्काय लाइट हॉस्पिटालिटी प्रायव्हेट लिमिटेडच्या माध्यमातून वाड्रांच्या व्यवसाय क्षेत्रात पोहचले. या दोन्ही कंपन्यांच्या माध्यमातून ही रक्कम कायदेशीर करण्याचा प्रयत्न झाला. मात्र या कंपन्यांच्या नावे आधीच काही गुन्हे आहेत.

### ३३४ पक्षांची नोंदणी रद्द

**नवी दिल्ली :** निवडणूक आयोगाने नोंदणीकृत परंतु मान्यता नसलेल्या ३३४ प्रादेशिक पक्षांना नोंदणी यादीतून वगळले आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि स्वच्छ ठेवण्याच्या उपक्रमांतर्गत आयोगातर्फे या पक्षांची नोंदणी रद्द करण्यात आली. पडताळणीनंतर प्रत्येक पक्षाला स्वतंत्र सुनावणी आणि स्पष्टीकरणाची संधी देण्यात आली. या संपूर्ण प्रक्रियेत ३३४ पक्ष आयोगाच्या अटींचे पालन करण्यात अपयशी ठरल्याने त्यांना नोंदणीकृत पक्षांच्या यादीतून वगळण्याचा निर्णय झाला.नोंदणी रद्द झाल्यानंतर संबंधित पक्षांना प्राप्तिकर कायदा, निवडणूक चिन्हे (आरक्षण व वाटप) कायदा, लोकप्रतिनिधित्व कायदा या अंतर्गत कोणताही लाभ मिळणार नसून या कारवाईवर आक्षेप असणाऱ्या पक्षांना ३० दिवसांच्या आत आयोगाकडे दाद मागता येणार आहे.

## रायगड पालकमंत्रिपदाचा तिढा सुटेना

# ध्वजारोहणावरून वादंग ?

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्याच्या राजकारणात नेहमीच विविधांगी रंगात पाहायला मिळते. सत्तेसाठी आज याच्याबरोबरोबर चूल पेटवायची तर उद्या त्याच्या दरवाजात जाऊन खुर्चीसाठीचा खुंटा बळकट करायचा असा राजकीय संगीतखुर्चीचा खेळ आता रायगडकरांना नवीन राहिलेला नाही. रायगड जिल्ह्यात महत्वाच्या राजकीय पदांमध्ये पालकमंत्री पदावर सत्ताधारी पक्षांमधील मंत्र्यांची करडी नजर कायम असते हे रायगडकरांनी अनुभवले आहे.

भाजप- शिंदे आणि अजित पवार गटाचे सरकार आले आणि जणू रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाला दृष्ट लागली. महायुतीच्या सरकारमध्ये अद्यापही रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा तिढा सुटलेला नाही. पालकमंत्री पदाचे कोडे तटकरे आणि गोगावले या दोन मंत्र्यांच्याडावपेचांमुळेसुटलेलेनाही. यंदाच्या स्वातंत्र्यदिनाच्या शासकीय ध्वजारोहणाचा मान मिळावा यासाठी सरकारदरबारी शिंदे आणि अजित पवार गटाच्या नेत्यांनी फिल्डिंग लावल्याचे समजते. यामुळे शुक्रवारी होणाऱ्या १५ ऑगस्ट रोजीच्या ध्वजारोहणाचा मान आदिती तटकरेंना मिळणार कि, भरत गोगवलेंना मिळणार याकडे रायगडकरांचे लक्ष लागले आहे.

> **रायगड जिल्ह्याच्या पोलीस मुख्यालयामध्ये १५ ऑगस्ट , २६ जानेवारी आणि १ मे म हाराष्ट्रदिन या दिवशी शासकीय ध्वजवंदन आणि ध्वजारोहण केले जाते. या तीन दिवशी ध्वजवंदन किंवा ध्वजारोहण करण्याचा मान पालकमंत्र्यांना असतो. त्या तीन दिवशी ध्वजारोहण करणाराचं जिल्ह्याचा पालकमंत्री असतो असा समज रायगड जिल्ह्यात दृढ आहे.**





महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा वाद शिगेला पोहचला होता. आदिती तटकरे यांना पालकमंत्री पद देऊ नये अशी आग्रही मागणी रायगड जिल्ह्यातील शिंदे गटाच्या आमदारांनी आणि पदाधिकाऱ्यांनी करून आंदोलनाचा इशारा दिला होता. महाडचे आमदार भरत गोगावले यांना पालकमंत्री पद द्यावे अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली होती. पालकमंत्री पदाचा हा वाद दिल्ली दरबारीदेखील पोहोचला आहे. शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांना पालकमंत्री पद मिळणार अशा चर्चांना उधाण आल्यानंतर रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या डावपेचामुळे भरत गोगवलेंचे पालकमंत्री पदाचे स्वप्न तूर्तास भंगले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनादेखील रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाबाबत विचारणा केली जाते. त्यावेळी वेळ मारून नेण्यापलीकडे राज्याचे हे महत्वाचे नेतृत्व काहीबाही करीत नाहीत. रायगड जिल्ह्याला पालकमंत्री नसलातरी विकासासाठी निधीचे नियोजन अधिक आणि योग्य केल्याचे यावेळी सांगितले जाते. परंतु आता पालकमंत्री पदाचा तंटा ध्वजारोहण करण्यावरून सुरू झाला आहे. त्यामुळे १५ ऑगस्टला नक्की ध्वजारोहण कोण करणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

भारतीय जनता पार्टी, शिंदे शिवसेना आणि अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महायुती सरकार स्थापन होऊन आठ महिने झाले. तरीही रायगड जिल्ह्याला पालकमंत्री पद जाहीर करण्यात आलेले नाही. शिंदेसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पालकमंत्री पदावरून रस्सीखेच सुरू आहे. यामुळे सत्तेत असणाऱ्या लोकप्रतिनिधींमध्ये शासकीय ध्वजवंदन किंवा ध्वजारोहण करण्याचा मान मिळवण्यासाठीची धडपड सुरु आहे.

## आमदारांच्या गावातच गांजा अन् तलवारींचा साठा

- **अलिबाग व मांडवा पोलिसांची संयुक्त कारवाई**
- **तीन जणांना पोलिसांनी केली तातडीने अटक**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शिंदे शिवसेना गटातील आमदार महेंद्र दळवी यांच्या ग्रामपंचायत हद्दीतील थळबाजार गावातच गांजा, गावठी दारू आणि तलवारींचा साठा सापडला आहे. अलिबाग व मांडवा पोलिसांनी शनिवारी सायंकाळी थळबाजार गावातील एका घरावर छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी तीन जणांना अटक केली आहे. अटक केलेल्यांमध्ये रियाज अनवारे (थळ बाजार), करण पवार (थळपेठ) आणि ओमकार पेडणेकर (संभाजीवाडा) यांचा समावेश आहे.

या तिघांकडून ११ आजार २१० रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला आहे. यामध्ये गांजा, दारू आणि चार तलवारी पोलिसांनी ताब्यात घेतल्या आहेत. अटक केलेल्या आरोपींमध्ये दोन आरोपींवर अगोदरपासूनच अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. थळपासून कनकेश्वर फाटा परिसरात बेकायदेशीररित्या गांजाची विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या परिसरात पोलिसांनी पाळत ठेवली होती. एका व्यक्तीकडे गांजा असल्याची माहिती मांडवा पोलिसांना खात्रीशीर सुत्रांकडून मिळाली होती. •> पान २ वर

> **अलिबागच्या आमदारांच्या ग्रामपंचायत हद्दीत देखील सुरु असलेल्या अवैध धंद्यांना चाप लावण्यासाठी पोलिसांनी पावले उचलली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून शनिवारी अलिबाग आणि मांडावा पोलिसांनी संयुक्तरित्या कारवाई केली. यापूर्वी रायगड जिल्ह्याच्या किनाऱ्यांवरील डिझेल तस्करीची पाळेमुळे थळ येथे येऊन थांबतात अशा चर्चांना उधाण आले होते. डिझेल तस्करांवर पोलिसांनी कारवाई केल्यानंतर आता अमलीपदार्थ विक्री करणाऱ्यांना टार्गेट करण्यात येत आहे. या कारवाईत अजून नव्या चेहऱ्यांची माहिती समोर येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.**

## महिलेने रक्षाबंधनादिवशीच संपविले जीवन

### पुण्यात वैष्णवी हगवणे प्रकरणाची पुनरावृत्ती

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

पुण्यात भारती विद्यापीठ परिसरात नवविवाहित स्नेहा झेंडगेने सासरच्या छळ व २० लाख रुपयांच्या आर्थिक मागणीमुळे आत्महत्या केली. पतीसह सात जणांवर शारीरिक, मानसिक छळ आणि हुंडाबळीच्या आरोपांखाली गुन्हा दाखल. स्नेहाने रक्षाबंधनादिवशी घरात कोणी नसताना गळफास घेऊन जीवन संपवले.

राज्यभर चर्चेत असलेले वैष्णवी हगवणे प्रकरण ताजे असतानाच पुण्यातील भारती विद्यापीठ परिसरात आणखी एका नवविवाहित महिलेने सासरच्या छळाला कंटाळून जीवन संपविल्याचा धक्कादायक घटना घडली आहे. पती आणि सासरच्या लोकांच्या सततच्या शारीरिक व मानसिक छळामुळे, तसेच कंपनी सुरू करण्यासाठी २० लाख रुपये देण्याच्या दबावामुळे नवविवाहित महिलेने राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केली आहे.

भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात या प्रकरणी पती विशाल झेंडगे, सासरे संजय झेंडगे, सासू विठाबाई झेंडगे, दिर विनायक झेंडगे, नणंद तेजश्री थिटे, नणंदेचा पती परमेश्वर थिटे आणि सासऱ्यांचे साडू भाऊसाहेब कोल्हाळ यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात •> पान २ वर

## दोन एसटी बसेसची समोरासमोर धडक

### चालकासह प्रवासी जखमी

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड आगारातून सुटलेली महाड-सांदोशी आणि माणगाववरून आलेली माणगाव-किल्ले रायगड या दोन एसटी बसेसची समोरासमोर धडक झाली. या अपघातात प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींना पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

महाडवरून सांदोशी गावाकडे जाणारी एसटी बस तर माणगाववरून किल्ले रायगडाकडे जाणारी एसटी बस या दोन बसेस बांधणीच्या माळावर येताच समोरासमोर धडक झाली. या अपघातात चालक अविनाश विंचोरकर तर गणपत कदम, सीता कदम, गणेश जाधव, राजाराम लांबर, अपर्णा सूरज शेडगे, पूजा मांडे, स्मिथ मांडे, स्वप्नील उमराटकर, वृषाली संतोष मोरे, सुचिता सुनील धोत्रे हे प्रवासी जखमी झाले आहेत. त्यांच्यावर पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू करण्यात आले आहेत.




## समुद्रात बुडून एकाचा मृत्यू

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

आरावी समुद्रात बुडून एका इसमाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.आरावी येथील मराठी शाळेच्या मागील बाजूस असलेल्या समुद्रकिनाऱ्यावर सायंकाळी पाच वाजता एक इसम मृत अवस्थेत नागरिकांना वाळूत आढळून आला.आरावी येथील अमोल पुसाळकर यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात खबर दिली. मृताच्या पॅन्टच्या खिशात आधार कार्ड मिळाल्याने मृत व्यक्ती सचिन काशिनाथ होडबे (बोरीवली) येथील असल्याचे निष्पन्न झाले. होडबे हे पाण्यात पोहायला गेले असता पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडाले. श्वास गुदमरल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला.

**मुख्याध्यापकांना कागदपत्रे अपलोड करण्याचे आदेश** | **३० ऑगस्टपर्यंत असणार मुदत**

## शिक्षकांच्या प्रत्येक मान्यतेची होणार पडताळणी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

शालेय शिक्षण विभागाने १८ नोव्हेंबर २०१२ ते ७ जुलै २०२५ या काळातील सर्व माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांमधील शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कागदपत्रे तपासणीचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी त्या सर्वांची कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करण्याची जबाबदारी प्राचार्य, मुख्याध्यापकांवर सोपविली आहे. त्यासाठी ३० ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

या सर्व कागदपत्रांच्या पडताळणीनंतर वैयक्तिक मान्यता, शालार्थ आयडीतील बोगसगिरी समोर येईल, असा हेतू आहे.



शालार्थ प्रणालीतून वेतन घेणाऱ्या सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कागदपत्रे शालार्थ प्रणालीत अपलोड करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. सर्व कागदपत्रे डिजिटलाइज केली जाणार आहेत. ७ जुलै २०२५ पूर्वी दिलेल्या सर्व शालार्थ आयडी म्हणजेच १८ नोव्हेंबर २०१६ ते ७ जुलै २०२५ या काळातील वैयक्तिक मान्यता आदेश, शालार्थ आयडी आदेश, खासगी व्यवस्थापनाच्या नियुक्तीचे आदेश व कर्मचारी रुजू अहवाल अशी कागदपत्रे त्या पोर्टलवर संबंधित शाळा-कॉलेजच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांनी अपलोड करायची आहेत. ७ नोव्हेंबर २०१२ ते १८ नोव्हेंबर २०१६ या काळातील शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे खासगी व्यवस्थापनाचे आदेश, कर्मचारी रुजू अहवाल, वैयक्तिक मान्यता ही कागदपत्रे द्यावी लागणार आहेत. यातून ज्या शिक्षकांच्या कागदपत्रांत तफावत किंवा बनावटगिरी आढळेल, त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली जाणार आहे. अशा कर्मचाऱ्यांवर निलंबन किंवा बडतर्फीची देखील कारवाई होऊ शकते.

७ नोव्हेंबर २०१२ ते ७ जुलै २०२५ या काळातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे रुजू अहवाल, वैयक्तिक मान्यता, नियुक्ती आदेश व शालार्थ आयडी अशी सर्व कागदपत्रे तपासली जाणार आहेत. त्यावेळी बोगस कागदपत्रांद्वारे कोणी वेतन घेत असल्याचे आढळल्यास त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले जाणार आहेत. सप्टेंबरपासून प्रत्येकाची कागदपत्रे तपासणी केली जाणार आहे.

राज्यातील अपात्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नावे शालार्थ प्रणालीत असून, ते नियमबाह्यपणे वेतन घेत आहेत. त्यांच्या शोधासाठी शालेय शिक्षण विभागाने पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, कायदा व सुव्यवस्थेचे पोलीस महानिरीक्षक मनोज शर्मा व शिक्षण सहसंचालक हारुन आतार यांचे विशेष चौकशी पथक नेमले आहे. २०१२ पासूनच्या मान्यता व शालार्थ आयडीची पडताळणी ही समिती करणार आहे.


विनम्र अभिवादन



शालिनीताई जयराम पाटील

शोकाकुल

सौ. शैलजा घरत, नागाव, नवी मुंबई

# प्रवाशांचा होणार आरामदायी प्रवास!

## एसटी महामंडळाच्या नियोजनाला वेग

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**गणेशोत्सव सण अवघ्या दोन आठवड्यांवर येऊन ठेपला आहे. या सणानिमित्त कोकणात जाणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. हे पाहता रेल्वेसह एसटी प्रशासनाने जादा गाड्या सोडल्या आहेत. एसटी महामंडळाने घोषित केलेल्या जादा गाड्यांपैकी जवळपास निम्या गाड्यांचे आरक्षण पूर्ण झाले आहे. मात्र कोकणात जाणाऱ्या गाड्या मुंबईत प्रत्येक थांबा घेत नसून थांबा द्यावा, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात होती.**



दरम्यान एसटी महामंडळाने स्थानकांतील गर्दी टाळण्यासाठी तात्पुरते बस थांबे निश्चित केले आहेत. तसेच बसथांब्यावरून कोकणात जादा गाड्या मार्गस्थ करण्यात येणार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, महामुंबईतून कोकणासाठी २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरदरम्यान पाच हजार जादा गाड्या सोडण्याची घोषणा एसटी महामंडळाने केली आहे. यामध्ये महिला, ज्येष्ठ नागरिकांना विशेष गाड्यांमध्ये सवलत दिली जात आहे. मुंबई, पालघर, ठाणे विभागातून एकूण २,१८६ गाड्यांचे आरक्षण झाले आहे. जादा गाड्यांपैकी १,५४७ सामूहिक आणि ५३३ वैयक्तिक गाड्यांचे आरक्षण पूर्ण झाले आहे. तर सध्या १०६ गाड्यांचे आरक्षण सुरू आहे.

कोकणात जाणाऱ्यांची मोठी संख्या पाहता एसटी स्थानकांमध्ये मोठी गर्दी होत आहे. त्यामुळे प्रवाशांनी महामुंबईत बस थांबे द्यावे अशी मागणी प्रवाशांनी केली होती. त्यानुसार, एसटी महामंडळाने स्थानकांतील गर्दी टाळण्यासाठी तात्पुरते ४० बस थांबे निश्चित केले आहेत.

### या ठिकाणाहून जादा वाहतूक

मुंबई सेंट्रल - साईबाबा, काळाचौकी, गिरगाव, कफपरेड, काळबादेवी, महालक्ष्मीपरळ - सेनापती बापट मार्ग दादर, मांगल्य हॉल (जोगेश्वरी)कुर्ला नेहरूनगर - बर्वेनगर, सर्वोदय, टागोरनगर, घाटला, डी.एन. नगर, गुंदवली, आनंदनगर, शास्त्रीनगर, पार्ले, खेरनगर, वांद्रे, शीवठाणे- लोकमान्यनगर, श्रीनगर, विटावा, भाईंदर, नॅन्सी कॉलनी, मालाड, डहाणूकरवाडी, चारकोप, महंतचौक, संकल्प सिद्धी गणेश, भांडुप (पश्चिम आणि पूर्व), मुलुंड, विठ्ठलवाडी, बदलापूर, अंबरनाथ, कल्याण, डोंबिवली, नालासोपारा, पनवेल, उरण, वसई, अर्नाळा



# उरण महसूल विभागाने राबविला महसूल सप्ताह

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण महसूल विभागाने एक ते सात ऑगस्टपर्यंत राबविलेल्या विशेष महसूल सप्ताहात नागरिकांना विविध प्रकारचे ३५१ दाखले तर शासकीय जागेवर केलेल्या २० अतिक्रमित जमिनींची पाहाणी केली. एक अवैध पार्किंग निष्कासित करण्यात आले असल्याची माहिती तहसीलदारांनी दिली.

महसूल विभागाने राज्यभरात विशेष महसुली सप्ताह साजरा करण्याचे आदेश दिले होते. उरण तालुक्यातील शेतकरी, नागरिकांसाठी राबविण्यात आलेल्या महसूल सप्ताहाचा लाभ घेण्याचे आवाहन उरण तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी केले होते. आवाहनानंतर आठवडाभर आयोजित करण्यात आलेल्या या सप्ताहाला शेतकरी, नागरिकांनीही चांगलाच प्रतिसाद दिला.

या सप्ताहाच्या शुभारंभाच्या पहिल्याच दिवशी महसूल संवर्गातील कार्यरत गुणवंत कोतवाल, शिपाई, तलाठी, मंडळ अधिकारी, अव्वल कारकून, नायब तहसीलदार, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी, उत्कृष्ट कामगिरी करणारे अधिकारी आदी ४५ जणांशी सुसंवाद साधून प्रमाणपत्र देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. दुसऱ्या दिवशी कोप्रोली, जासई महसुली मंडळ विभागातील शासकीय भूखंडावरील २०११ पुर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ पात्र असलेल्या २० अतिक्रमणांची पाहणी करण्यात आली. तिसऱ्या दिवशी कोप्रोली महसुली मंडळाच्या विभागातील पिरकोन- पानंद दरम्यानचा अतिक्रमित रस्ता कारवाई करुन मोकळा करण्यात आला.तसेच पिरकोन- पानंद रस्ता, पुनाडे व विंधणे आदिवासी वाडीवरील दुतर्फा रस्त्यावर सावली देणारी ३८ झाडे लावण्यात आली.

४ ऑगस्ट रोजी कोप्रोली मंडळ विभागात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात आले. या अभियानात उत्पन्न, जातीचे, रहिवासी, ज्येष्ठ नागरिक आदी मिळून ३५१ दाखल्यांचे वाटप करण्यात आले. तर रेशनकार्ड नसलेल्या ९ नागरिकांना रेशनकार्डचे वाटप करण्यात आले.पाचव्या दिवशी डिबीटी योजनेअंतर्गत २९ लाभार्थ्यांची अधिकाऱ्यांनी घरी जाऊन भेट घेतली. त्यांची केवायसी करण्यासाठी कागदपत्रे जमा करण्यात आली.सहाव्या दिवशी जासई, पागोटे येथील शासकीय जागेवर अतिक्रमण करुन उभारण्यात आलेले अवैध पार्किंग निष्कासित करण्यात आले.

# मुरुडमध्ये नारळी पौर्णिमा साजरी

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

संपूर्ण राज्यभरात नारळी पौर्णिमा सण मोठ्या आनंद आणि उत्साहात साजरा केला जातो. यादिवशी समुद्राला नारळ अर्पण करण्याची परंपरा आहे. त्यामुळे नारळी पौर्णिमेनिमित्त आज सायंकाळी पासून समुद्रकिनारी असणाऱ्या कोळी बांधवाची लगबग पाहायला मिळते.आज पुन्हा पावसाला सुरुवात केल्याने काहीसा हिरमोड झाला.

समुद्राकाठी राहाणाऱ्या व प्रामुख्याने मासेमारी करणाऱ्या कोळी लोकांचा हा महत्त्वाचा सण आहे. पावसाळ्यात समुद्र प्रचंड खवळलेला असतो. बोटी, जहाजांची वर्दळ या काळात बंद असते. समुद्राचा कोप होऊ नये, जहाजे, नौका सुरक्षित राहाव्यात, समुद्र शांत



होण्यासाठी कोळी बांधवासह शहरातील नागरिकांच्या वतीने सजवलेल्या सोन्याच्या नारळाची पुजा करून भव्य मिरवणूक लक्ष्मीखार येथील बापदेव मंदिरापासून समुद्रकिनारा पर्यत काढण्यात आली.तद्नंतर सोन्याच्या नाराळाची पुजन व आरती करुन दर्या राजाला सोन्याचा नारळ अर्पण करण्यात आला.यावेळी मुरुड शहरात व कोळीवाड्यात आनंदाचे वातावरण पसरलेले पाहायला मिळत होते.

# ‘श्रावणसरी’ मैफिलीत कलाकारांचा सन्मान

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुडमध्ये कोकण मराठी साहित्य परिषदेच्या मुरुड शाखेतर्फे माजी अध्यक्षा प्रतिभा जोशी यांच्या निवासस्थानी संपन्न झालेल्या श्रावणसरी मैफिलीत कलाकारांचा सन्मान करण्यात आला.

सुरुवातीला कोकण मराठी साहित्य परिषदेचे शाखा अध्यक्ष संजय गुंजाळ यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे औचित्य साधून जुईली संजय गुंजाळ हिला अजित दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चित्रपट सांस्कृतिक विभाग महाराष्ट्र प्रदेश आयोजित राज्यस्तरीय शॉर्ट फिल्म डॉक्युमेंटरी तसेच रील स्पर्धेमध्ये



आपली व्हय मी सावित्रीची लेक या चित्रपटाची निवड झाली. या लघुपटाला जिल्हास्तरीय पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल नगरपरिषद शिक्षण समिती प्रशासन अधिकारी दिपाली दिवेकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

नरेश माळी यांना डॉक्युमेंट्रीसाठी दुसरा क्रमांक मिळाला याबद्दल शाखा अध्यक्ष संजय गुंजाळ यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

जुईली गुंजाळ यांनी आपल्या मनोगतात मुरुडच्या कलाकारांसाठी एखादी जागा असावी, असे विचार व्यक्त केले. नंतर श्रावणसरी कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी अध्यक्ष संजय गुंजाळ यांनी चारोळी, उपाध्यक्ष उषा खोत शंभू जपाला बैसला, नैनिता कर्णिक श्रावणमास, युवाशक्ती प्रमुख आशिष पाटील निसर्गावर आधारित चारोळ्या, जिल्हा प्रतिनिधी सिद्धेश लखमदे श्रावण, पाऊस, सदस्य जया ठाकूर, श्रावण सरी, वैशाली कासार आठवणीतील माझा झोका, शकुंतला रोटकर बारा महिन्याचे महत्व, नयन कर्णिक जीवनाचे सार, प्रतिभा जोशी रूण झूण त्या पाखरा हे हे गीत गायले. आशुतोष कर्णिक केशवा माधवा हे भक्तीपर गीत म्हटले. दिपाली दिवेकर यांनी दुर्गा भागवत चार ऋतुचक्र पुस्तकातील श्रावण साखळी याचे वाचन करून पाण्याचे महत्व विशद केले. अशा प्रकारे श्रावण सरी हा कार्यक्रम रंगतदार झाला.

# स्वच्छता मोहिमेच्या माध्यमातून शहर स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान हे पर्यटन स्थळ असल्याने सातत्याने या शहरातील रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी पडणारा कचरा तत्काळ संकलित केला जातो. मात्र शहर कायम स्वच्छ ठेवण्यासाठी माथेरान गिरीस्थान नगरपरिषद कडून प्रयत्न सुरू आहे.दरम्यान एक जुलै ते ३१ जुलै दरम्यान शहरात दररोज स्वच्छता मोहीम राबविण्यात आली असून त्यानंतर स्वच्छ सर्वेक्षण मध्ये आघाडीवर राहण्यासाठी ऑगस्ट महिन्यात देखील स्वच्छतेवर भर देण्यात आला आहे.

माथेरान हे पर्यटक यांच्या आगमनांवर चालणारे शहर असून या शहरात येणारे पर्यटक हे पर्यटनासाठी येत असतात. अशा



पर्यटकांकडून माथेरान नगरपरिषद स्वच्छता कर संकलित करीत असून शहर स्वच्छ ठेवण्याचे कर्तव्य देखील पालिका प्रशासनाचे असते.त्यात माथेरान हे शहर राज्यात आणि देशात स्वच्छ शहर म्हणून ओळखले जाते. त्यामुळे स्वच्छ शहराची प्रतिमा जपण्यासाठी माथेरान पालिका देखील वेगवेगळे उपक्रम राबविण्यावर भर देताना दिसते. त्यात शासनाच्या आदेशाप्रमाणे शहराच्या स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.एक जुलै ते ३१ जुलै या महिनाभरात शहरातील प्रत्येक गल्ली बोळ येथे स्वच्छता आणि आरोग्य विभागाचे कर्मचारी यांच्या माध्यमातून ही मोहीम राबविण्यात आली. त्यानंतर स्वच्छ सर्वेक्षण अभियानात आता राष्ट्रीय पातळीवर आपल्या शहराची ओळख निर्माण करावी या हेतूने पालिका मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या संकल्पनेतून शहरात ऑगस्ट महिन्यात देखील अशी स्वच्छता विषयक कामे कायम ठेवली गेली आहेत. शहराचे प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाका पासून परिसर स्वच्छतेचे आव्हान स्वीकारून पालिका कर्मचारी स्वच्छतेवर भर देताना दिसत आहेत.शहरात प्रवेश करणारा महात्मा गांधी रोड तसेच कस्तुरबा रोड आदी ठिकाणी देखील स्वच्छता मोहिमा राबवून पर्यटकांना कचरा मुक्त शहरात आल्याचा आनंद देण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत.

या स्वच्छता मोहिमेत पालिका कर्मचारी आणि स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून पावसाळ्यात आपल्या शरीराची घ्यायची काळजी यावर पथनाट्य आणि प्रात्यक्षिके दाखवण्यात आली.त्यात हात स्वच्छ ठेवणे, घर स्वच्छ ठेवणे, शौचालय स्वच्छ ठेवणे, नाले आणि गटारे स्वच्छ ठेवणे, सार्वजनिक स्थळे स्वच्छ ठेवणे आणि परिसर स्वच्छ ठेवण्यावर भर देण्यात आला आहे.

# महिला दक्षता समितीची पोलीस बांधवांना ओवाळणी

**। शिहू । वार्ताहर ।**

पोलीस बांधव हे समाजाचे रक्षण अहोरात्र करत असतात. त्यांना कुठलाही सणवार असो आपल कर्तव्य पार पाडाव लागत. कोणताही सण उत्सव असो समाजात कोणतंही तेढ निर्माण होऊ नये यासाठी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी झटत असतात.

त्यांच्या त्यागाच्या व कर्तव्याच्या भावनेला जाणून नागोठणे महिला दक्षता समितीच्या वतीने ७ ऑगस्ट रोजी नागोठणे पोलीस ठाण्यात पोलीस बांधवाना राखी बांधण्यात आली.

यावेळी उपविभागीय



पोलीस अधिकारी रविंद्र दोंडकर, नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी, दक्षता समितीच्या दर्शना जवके, सुजाता जवके, कल्पना टक्के, निलोफर पानसरे, शबाना मुल्ला, अपर्णा सुटे, मंजुळा म्हात्रे, डॉ. कांचन शेळके, संगीता पोलसानी, नंदा गायकवाड यांसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे बलिवरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक चंद्रकांत अनंता भुसाळ वगैरे ४ यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ४७ | १/ब | ३-६४-०० पैकी लिहुन देणार यांच्या मालकीच्या २-०४-०० क्षेत्रापैकी ०-८०-०० इतके विकत दिलेले क्षेत्र | ३-०० |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.११/०८/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

# गाईच्या वासराला दिले जीवदान

**। म्हसळा । वार्ताहर ।**

श्रीवर्धन राज्य मार्गावर सकलप येथील गोपालक शेतकरी कानु कांबळे यांची दुभती गाय वासरू चरण्यासाठी गावा शेजारील जंगलात गेली असता मोकाट कुत्र्यांनी गाईच्या वासरावर जीवघेणा हल्ला केला होता.

याचवेळी जांभूळ ग्रामपंचायत सरपंच सदर मार्गावरून आपले ताब्यातील ऑटो रिक्षाने म्हसळाकडे येत असताना त्यांना रस्त्याचे कडेला चार ते पाच भटक्या कुत्र्यांनी वासरावर हल्ला केल्याचे निदर्शनास आले. सरपंच मोरे यांनी कर्तव्य दक्षात दाखवून शिताफीने रक्तबंबाळ झालेल्या वासराला कुत्र्यांचे तावडीतून मुक्त करून त्याला रिक्षात बसून उपचारासाठी पशुवैद्यकीय दवाखान्यात दाखल केले.झालेली घटना मोरे यांनी म्हसळा तालुका माजी सभापती महादेव पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली.पाटील यांनी सोशल मीडियाचे माध्यमातून गाय वासराचे मालकाचा शोध घेतला आणि त्यांचे ताबेत दिला.

मृत्यूच्या दाडेत गेलेल्या वासराला वेळीच उपचार मिळाल्याने जीवदान मिळाले आहे.याचे सर्व श्रेय प्राणी मित्र जांभूळ सरपंच किरण मोरे यांना जात असल्याने जांभूळ सरपंच मोरे यांनी केलेल्या सतकृत्याचे म्हसळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदिप कहाले यांनी पोलिस ठाण्यात पुष्पगुच्छ देऊन नागरी सत्कार केला आणि धन्यवाद दिले.सत्कारावेळी माजी सभापती महादेव पाटील, रिक्षा चालक किशोर गाणेकर, अविनाश जंगम उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना शाश्वत शेतीविषयी मार्गदर्शन

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त शेती लागवड करुन अधिक उत्पन्न घ्यावे यासाठी वडगाव तसेच होराळे येथे कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा अंतर्गत डॉ. एम.एस.स्वामीनाथन यांच्या जन्म दिवसानिमित्ताने शाश्वत शेती,या माध्यमातून राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन योजने अंतर्गत हा उपक्रम हाती घेण्यांत आला.

यावेळी कृषी विज्ञान केंद्र येथील शास्त्रज्ञ डॉ. मांडवकर यांनी शेतकऱ्यांना शाश्वत शेती व नैसर्गिक शेती, जीवामृत, बिजामृत, दशपर्णी अर्क, अच्छादन या विषय सखोल मार्गदर्शन केले. तालुका कृषी अधिकारी निंबाळकर यांनी शाश्वत शेतीचे जनक डॉ. एम.



एस. स्वामीनाथन यांचे कृषी क्षेत्रातील अनमोल कामगिरी असून शाश्वत शेती, नैसर्गिक शेती, कृषी विभागातील विविध योजना शेतकऱ्यांना माहिती दिली.

प्रभारी मंडळ कृषी अधिकारी नितीन महाडिक यांनी देशी गायीचे महत्व शेतकऱ्यांना पटवून दिले. उप कृषी अधिकारी खालापूर सुरेश उघडा यांनी शेतकऱ्यांना खोड किडा, सुरळीतील अळी, पाणी गुंडाळणारी अळी विषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

सदर प्रशिक्षणास ग्रुप ग्रामपंचायत होराळे सदस्य सुरेखा दळवी, गटाचे अध्यक्ष विश्वास साळवी, उपाध्यक्ष अविराज बुरुमकर, सचिव हातनोलकर, गटातील कृषी सखी दर्शना पवार, वडगाव येथील महादेव गडगे, गटाचे अध्यक्ष हनुमंत पाटील, उपाध्यक्ष प्रभाकर जांभुळकर, सचिव भीमराव गाताडे, गटातील कृषी सखी मीनाक्षी पाटील. आत्मा बी टी एम प्रज्ञा पाटील यांनी प्रशिक्षणाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले. सहाय्यक कृषी अधिकारी शेटे व गटातील सदस्य अंकुश शेलार व सहाय्यक कृषी अधिकारी प्रशांत कदम यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलाने कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे - सुगवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,**

| जमीन मालक | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| १. मनोहर देहु चवळे<br>२. सिताबाई जैतू चवळे<br>३. भाऊ जैतू चवळे<br>४. तुकाराम जैतू चवळे<br>५. शांताराम जैतू चवळे<br>६. विठाबाई नामदेव भगत | ३०/२०/क | ०.५१.००<br>पो. खराबा ०.६२.००<br>एकुण क्षेत्र १.१३.०० | ०.४५ |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वास कळावे.

तारीख :- ११/०८/२०२५

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
पत्ता - मुद्रा बिल्डिंग, ओम श्रमसाफल्य
कोतवालनगर-कर्जत, जि. रायगड
मो. नं. ८४४६१४८७८१

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिल, श्री. सुनिल विजयकांत तांबोळी, राहणार : सदनिका क्र. ८१, ए विंग, कल्पतरू वॉटर फ्रंट, पंचमुखी हनुमान मंदिर जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, यांच्या मालकीच्या मौजे बेलोंडाखार, ता. उरण, जि. रायगड येथील भूमापन क्र. ६३, भूमापन क्र. चा उपविभाग ३, भूधारणा पद्धती २, क्षेत्र ० हे. ४० आर. ७ पॉ., पो.ख. ० हे. ०१ आर. ५ पॉ, एकूण ० हे. ४२ आर. २ पॉ., आकार रू. ६.०० पै. या वर्णनाच्या मिळकतीचा मुळ खरेदीखताचा दस्त क्र. ७९८/२०१० हा त्यांच्याकडून प्रवासादरम्यान गहाळ झालेला असून, त्याबाबत त्यांनी दि. ०८/०८/२०२५ रोजी संबंधीत पनवेल शहर पोलिस स्टेशनमध्ये हरवलेल्या मालमत्तेचा तक्रार क्र. १४८९/२०२५ नोंदणी केलेला आहे.

तरी, आमच्या अशिलांच्या मालकीच्या उपरोक्त नमूद वर्णनाच्या जमीन मिळकतीचे मुळ दस्त कोणास सापडल्यास त्यांनी आमच्या अशिलांच्या वरील वर्णनाच्या राहत्या घराच्या पत्त्यावर अथवा त्यांचे वकील म्हणून माझे नोटीसीतील नमूद कार्यालयीन पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन द्यावे, कारण, आमचे अशिलांनी त्यांचे मालकीची सदर जमीन मिळकत बँकेकडे तारण ठेऊन कर्ज घेणेचे ठरविले आहे. त्यामुळे सदर जमीन मिळकतीच्या हरवलेल्या मुळ खरेदीखताच्या दस्ताचा कोणीही, कोठेही गैरप्रकारे वापर करू नये तथा तशा प्रकारे कोणत्याही प्रकारचा सदर जमीन मिळकतीच्या गहाळ झालेल्या मुळ कागदपत्रांचा गैरव्यवहार करण्यास वापर केलेला असल्यास वा सदर जमीन मिळकतीवर कोणाचाही दावा, तारण, गहाण व बोजा असल्यास, त्याबाबत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेपासून ०७ दिवसांच्या आत हितसंबंधी व्यक्तीने वा संस्थेने लेखी स्वरूपात नोटीसीतील नमूद माझे कार्यालयीन पत्त्यावर रजिस्टर्ड पोष्टाने कळवावे, हे या नोटीसीने तमाम जनतेस सुचित करणेत येत आहे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १०/०८/२०२५

**ॲड. अतुल तुकाराम भोपी**
कार्यालय :- बी/८, माणेक नगर को-ऑप. हौ. सोसायटी,
महाराणा प्रताप रोड, परदेशी आळी, पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६.
मो.नं. ९३२४६७९५०७

## पान १ वरून

## आता गणेशोत्सव मुख्यमंत्र्यांच्या घरी

महामार्ग सुरक्षित होता. मात्र काँक्रिटच्या महामार्गावर अनेकांचे बळी गेल्याने या सरकारला पथकर वसुली आणि कंत्राटदारांची चिंता लागली आहे.

सरकारने या महामार्गावर रस्ते अपघातामधील मृतांच्या वारसदारांना सरकारी नोकरी आणि आर्थिक मदत देण्याची मागणी रविवारी आंदोलकांनी केली. हा महामार्ग सुरक्षित वापरता येईल असा बांधावा अशी अपेक्षा यावेळी आंदोलकांनी व्यक्त केली. रस्ते बांधणारे अधिकारी, कंत्राटदार आणि सरकारमधील काही राज्यकर्त्यांच्या संगनमतामुळे या महामार्गाचे काम अपूर्ण राहिल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. जन आक्रोश समितीचे अजय यादव आणि विदेश कदम यांनी सुद्धा १५ वर्षे रखडलेल्या या महामार्गाचे काम तातडीने पूर्ण केल्यानंतर सागरी किनारा महामार्ग, द्रुतगती महामार्ग यांसारख्या प्रकल्पांची कामे सुरूवात करा अशी मागणी यावेळी केली.

## आमदारांच्या गावातच गांजा अन् तलवारीचा साठा

शनिवारी सायंकाळी कनकेश्वर फाटा परिसरात असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे गांजा दिसून आला. त्याची कसून चौकशी केल्यावर थळबाजारमधून एका व्यक्तीकडून गांजा विकत घेतला असल्याची त्याने माहिती दिली. त्यानंतर मांडवा आणि अलिबाग पोलिसांनी संयुक्तपणे छापा टाकून थळबाजार, थळपेठ आणि संभाजीवाडा मधील घरावर कारवाई केली. या छाप्यात गावठी दारू, सुमारे अडीच ग्रॅम गांजा, चार तलवारी, काती आणि कोयता या शस्त्रांचा साठा सापडला. बेकादेशीररित्या सुरू असलेल्या या धंद्यावर पोलिसांनी कारवाई केल्याने परिसरात खळबळ उडाली. या प्रकरणी तिघांना ताब्यात घेण्यात आले असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या तिघांकडून पोलिसांनी ३९० रुपयांचा २२४ ग्राम गांजा, ७३१० रुपयांची रोख रक्कम, चार तलवारी, एक काती आणि एक कोयता पोलिसांनी जप्त केला आहे. थळ परिसरात हे त्रिकुट अमली पदार्थ आणि शास्त्र विक्रीचा धंदा करीत असल्याची चर्चा होती. परंतु या गांजा विक्री करणाऱ्यांच्या कारवाईमध्ये राजकीय दबाव येत असल्याने त्यांचे फावले होते. परंतु रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी चार्ज घेतल्यानंतर जिल्ह्यात अमली पदार्थ तस्करी आणि विक्रीवर आळा बसवण्यासाठी मोहीम राबविण्यात येत आहे.

## महिलेने रक्षाबंधनादिवशीच संपविले जीवन

आला आहे. स्नेहा झेंडगे (मूळगाव कर्देहळी, ता. दक्षिण सोलापूर) असे या मृत महिलेचे नाव आहे. पती व कुटुंबियांनी कंपनी सुरू करण्यासाठी तब्बल २० लाख रुपयांची मागणी केली. ही रक्कम माहेरहून आणण्यासाठी तिच्यावर वेळोवेळी दबाव आणला.यासाठी केवळ मानसिक नाही तर शारीरिक छळही करण्यात आले. तिला हीन वागणूक देण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्नेहा झेंडगे आणि विशाल झेंडगे यांचा विवाह मे २०२४ मध्ये झाला होता. लग्नानंतर काही दिवस स्नेहाचे आयुष्य सुरळीत चालले, मात्र लवकरच सासरकडून त्रास सुरू झाला. स्नेहाने यापूर्वी पोलिसांत गुन्हा दाखल केला होता, मात्र सासऱ्यांचे साडू भाऊसाहेब कोल्हाळ यांनी तिला दम देऊन तो गुन्हा मागे घेण्यास सांगितले. त्यामुळे स्नेहाचा मानसिक तणाव अधिकच वाढला. दरम्यान सातत्याने होणारा छळ, आर्थिक मागणी आणि कौटुंबिक हिंसाचार यामुळे ती पूर्णपणे खचली. अखेर रक्षाबंधनादिवशीच म्हणजेच ९ ऑगस्ट २०२५ रोजी घरात कोणी नसताना स्नेहाने गळफास घेऊन आत्महत्या केली.

## निवडक



### अनेक गावांतून निघाल्या क्रांतिज्योती

**नेरळ :** कर्जत तालुका क्रांती दिन शासकीय पातळीवर साजरा करण्यात आला. यावर्षी प्रथमच क्रांतिदिनी विविध शाळांमधून क्रांतिज्योती काढण्यात आल्या. कर्जत शिक्षण विभागाने प्रथमच पुढाकार घेत क्रांतिज्योत माणिवली येथील हुतात्मा स्मारकात नेण्याची संकल्पना प्रत्यक्षात उतरली. यावेळी तब्बल सात शाळांनी आपल्या क्रांतिज्योती दौड काढून नेली. कर्जत तालुका शिक्षण विभागाने आपल्या शिक्षण विभागातून क्रांतीज्योत नेण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार शनिवारी (दि.९) सकाळी विविध गावांतील क्रांतीज्योत माणिवली येथील हुतात्मा हिराजी पाटील स्मारकाकडे निघाल्या. शिक्षण विभागाचे गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे यांच्या नियोजनातून शिक्षण विभागाने एक क्रांतीज्योत पहाटे ६ वाजता नेरळ येथील माथेरान नाक्यावर असलेल्या हुतात्मा चौकातून काढली. यावेळी शिक्षण विभागाचे विस्तार अधिकारी सोनवणे, शिक्षक म्हात्रे यांच्यासह असंख्य शिक्षक त्यावेळी उपस्थित होते. ही क्रांतीज्योत माथेरान-कळंब राज्यमार्गाने आगरी समाज हॉल येथील हुतात्मा हिराजी पाटील मूर्ती येथे पोहचली. त्यानंतर धामोते, दहिवली, कोदीवले, बिरदोले अशी गावे करत अवसरे येथे पोहचली. त्यानंतर साडेनऊ वाजता क्रांती ज्योत माणिवली येथील हुतात्मा स्मारक येथे पोहचली. या ज्योतीचे सारथ्य नेरळ येथील एलएईएस शाळेच्या विद्यार्थ्यांनी देखील केले.

### विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान

**महाड:** रायगड शिक्षण प्रसारक मंडळ व लोकविकास सामाजिक संस्थेचे माजी अध्यक्ष तथा माजी आमदार स्व. माणिकराव जगताप यांच्या जयंतीचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना विशेष सन्मान देऊन गौरविण्यात आले. यावेळी विशेष व्याख्यान, माणिक सन्मान पुरस्कार व स्व. अण्णासाहेब सावंत विशेष पुरस्कार, संस्थांतर्गत गुणवंत सेवक पुरस्कार तसेच विशेष सन्मान सोहळा मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. तसेच शिक्षण, सामाजिक क्षेत्र व सेवाभावी कार्यात मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींना देखील पुरस्कार प्रदान करण्यात आले. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या मार्गदर्शनाने उपस्थित श्रोत्यांना प्रेरणादायी विचार ऐकायला मिळाले. या प्रेरणादायी व सन्माननीय सोहळ्यासाठी अतिरिक्त पोलीस महासंचालक विश्वास नांगरे-पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

### ‘लढा अजून संपलेला नाही’

**उरण:** तालुक्यातील शेवा कोळीवाडा येथील जेएनपीटी प्रकल्पबाधित मच्छिमार बांधवांवर गेली ४० वर्षे अन्याय चालू आहे. त्यांच्या गावाचे विस्थापन करून कायदेशीर पुनर्वसन न करता, अनेक वर्षे या कोळी बांधव आणि भगिनींना संक्रमण शिबिरात ठेवण्यात आले. अखंड संघर्ष, अंगावर खटले घेऊन, पुनर्वसनाच्या हक्कासाठी लढा देत अखेर १०.४६ हेक्टर जागेस २०२१ साली मंजुरी मिळाली. या मंजुरीस केंद्र सरकारची मान्यता मिळूनही जेएनपीटी प्रशासन, जिल्हा प्रशासन आणि राज्य सरकार हे शेतकरी व बिगर शेतकऱ्यांचे २५६ भूखंड नकाशा व भुखंड यादीला मंजूरी असताना सुद्धा वाटपास टाळाटाळ करीत आहेत. या अन्यायाविरोधात आणि रक्षाबंधन या सणाच्या पवित्र दिवशी कोळी बांधवांनी मंजूर नकाशा नुसार सिंबॉलिक ताबा व भूखंड वाटपाचा कार्यक्रम सुरु केला आहे. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे वकील अ‍ॅड. सिद्धार्थ इंगळे यांनी, माझ्यावर हा मान सोपवल्याबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे. माझी सामाजिक जबाबदारी आणि नैतिक कर्तव्य समजून, मी आपल्यासाठी सदैव कर्तव्यदक्ष राहीन. लढा अजून संपलेला नाही तो आता अधिक प्रखर झालेला आहे, असे परखड मत व्यक्त केले.

### डेरीवलीतील युवकाचे अपनयन



**पनवेल :** तालुक्यातील डेरीवली येथे राहणाऱ्या एका अल्पवयीन युवकाचे पालकांच्या कायदेशीर रखवालीतून अपनयन करण्यात आल्याची घटना घडली आहे. सनी शिवाजी पाटील (१६) या अल्पवयीन युवकाचे नाव आहे. त्याचा वर्ण सावळा, उंची ५.४ इंच, केस काळे वाढलेले, बांधा सडपातळ असून अंगात नेसून राखाडी रंगाचा टी शर्ट व काळ्या रंगाची जिन्स पॅन्ट आहे. त्याचे कोणीतरी पालकांच्या कायदेशीर रखवालीतून अपनयन केले आहे. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब फड हे करीत आहेत.

# पोशीर, शिलार धरणांना विरोध

- **सुनावणी न घेताच कामाची निविदा**
- **शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण**

### शेतकऱ्यांच्या जखमेवर मिठ

कर्जत तालुक्यातील या दोन्ही नवीन धरणासाठी शासनाने जमिनीचे संपादन केलेले नाही आणि असे असताना देखील शासनाने धरणाच्या कामाच्या निविदा काढल्याने शेतकरी वर्ग संतप्त झाला आहे. या दोन्ही धरणांना स्थानिक पातळीवर विरोध असून शासन स्तरावर होणारी पर्यावरण सुनावणी व हवामान बदल सुनावणी शासनाने घेतली नाही. वन जमिनीबाबत कोणताही निर्णय अद्याप झालेला नाही आणि त्याआधीच निविदा काढण्यात आली आहे. पोशीर धरणाच्या धरण, विद्युत विमोचक, सांडवा प्रणाली, पाणीपुरवठा याबाबत २,१३५ कोटींची निविदा आहे. शिलार धरणासाठी देखील १,६६७ कोटींची निविदा शासन स्तरावर पाटबंधारे विभागाने काढली आहे. या दोन्ही धरणांना कर्जत तालुक्यातील पाथरज ग्रामपंचायत आणि ओलमन ग्रामपंचायतमधील शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध लक्षात घेता शासन शेतकऱ्यांच्या जखमेवर मिठ चोळण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे.



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील पोश्री नदीवर बोरगाव येथे धरण बांधले जाणार आहे. तर, चिल्हार नदीवर शिलार येथे धरण बांधले जाणार आहे. या धरणाच्या कामासाठी शासनाने निविदा काढली असून शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांचा या दोन्ही धरणांना विरोध असून बोरगाव येथे होणाऱ्या पोशिर धरणाला ३० वर्षे येथील शेतकरी विरोध करीत आहेत. दरम्यान, या दोन्ही धरणांची पर्यावरण सुनावणी शासनाने घेतली नाही आणि असे असताना देखील निविदा काढण्यात आल्याने सरकार विरोधी वातावरण निर्माण झाले आहे.

जामरुंग येथे उगम पावणारी चिल्लार नदी उन्हाळ्यात कोरडी असते आणि त्यामुळे या नदीचे पाणी पावसाळ्यात अडवून धरण बांधण्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता दिली आहे. कर्जत तालुक्यातील पाथरज ग्रामपंचायत मधील शिलार, धोत्रे, धोत्रे वाडी या भागात नवीन धरण होणार आहे. शिलार धरणामुळे भविष्यात चिल्लार नदी बारमाही वाहती होणार असून उल्हास नदीवर कोंढाणा धरण बांधले जाणार असल्याने कर्जत तालुक्याच्या पाण्यावर ठाणे जिल्ह्यातील नागरिकांची तहान भागविली जाणार आहे.

राज्य सरकारने कर्जत तालुक्यातील बोरगाव येथील पोश्री आणि चिल्लार नदीवर शिलार येथे मध्यम धरण बांधण्याचा निर्णय घेतला आहे. ही धरणे नवी मुंबई आणि ठाणे जिल्ह्याची पाण्याची तहान भागविणर आहेत. पोशीर धरणासाठी ६,३९४ कोटींच्या तर शिलार धरणासाठी ४,८६९ कोटींच्या अंदाजपत्रकीय रकमेला राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता दिली आहे. भीमाशंकर अभयारण्य आणि येथील डोंगरात उगम पावलेली पोश्री नदीवर बोरगाव आणि कुरुंग गावांच्या हद्दीत धरण बांधले जाणार आहे. महाराष्ट्र सरकारकडून २००५ मध्ये कर्जत तालुक्यातील ओलमन ग्रामपंचायतमधील बोरगाव येथे धरण बांधण्याचे निश्चित झाल्यावर पहिल्यांदा प्राधिकरण कडून सर्वेक्षण करण्याते आले होते. त्यानंतर धरणाचे सर्वे क्षण करण्यासाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांना स्थानिक ग्रामस्थ पिटाळून लावत होते. त्यामुळे बोरगाव येथे होणाऱ्या धरणाला शेतकऱ्यांचा प्रचंड विरोध आहे. या धरणांमुळे बोरगाव, चई, चेवणे, उंबरखांड, भोपळेवाडी, पेंढरी आणि बोन्डेशेत ही गावे विस्थापित होणार आहेत. शेतकऱ्यांचा विरोध असतानाही या धरणाच्या कामासाठी राज्य सरकारने २० मे रोजी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिली आहे.

दरम्यान, कर्जत तालुक्यातील या दोन्ही नवीन धरणासाठी शासनाने जमिनीचे संपादन केलेले नाही आणि असे असताना देखील शासनाने धरणाच्या कामाच्या निविदा काढल्याने शेतकरी वर्ग संतप्त झाला आहे.

> **या धरणासाठी आमच्या भागातील शेतकऱ्यांचा विरोध आहे. आम्ही सातत्याने हा विरोध नोंदवत असून शासन स्तरावर आमच्या निवेदनाची साधी दखल घेतली जात नसल्याने आम्ही कोणाकडे दाद मागायची? तरी देखील आम्ही सनदशीर मार्गाने न्याय मागणार असून रायगड जिल्हाधिकारी यांना याबाबत निवेदन दिले जाणार आहे.**
> **– सतीश पाटील, सचिव, पोशीर धरण विरोधी संघर्ष समिती**

## सुतारवाडीत भटक्या कुत्र्यांचा उच्छाद

**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**



सुतारवाडी तसेच ढोकळेवाडी, कुडली येथील नाक्यावर भटके श्वान रस्त्याच्या मधोमध येऊन उभी असतात. त्यातील काही श्वानांच्या शरीरावरची त्वचा अत्यंत खराब झालेली आहे. त्यामुळे त्यातील काही श्वान पिसाळलेल्या अवस्थेत दिसत आहेत. अशा श्वानांनी रस्त्यावरून जाणारा येणाऱ्या व्यक्तींना दश केला तर मोठा बागा प्रसंग उद्‌भवण्याची शक्यता आहे. या परिसरामध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळा आहेत. तिथून लहान-मोठी मुल रस्त्याने ये-जा करत असतात. अशांना या भटक्या कुत्र्यांचा त्रास होऊ शकतो. अति वेगाने येणारे काही वाहन कधी कधी श्वानांना उडवून पोबारा करतात. त्यात मृत पावलेला श्वान त्याच ठिकाणी कुजत सडलेल्या अवस्थेत असतो. काही दिवसांनी या ठिकाणी दुर्गंधी पसरण्यास सुरुवात होते. या दुर्गंधीचा त्रास पादचारांना होत असतो. यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता आहे. मोकाट गुरांप्रमाणेच आता भटक्या कुत्र्यांचा ही नागरिकांना त्रास होत असतो. त्याचप्रमाणे वाहन चालकांना सुद्धा मोठी कसरत करून मार्ग काढावा लागत आहे.

## निजामपूर बाजारपेठ अपघातांचे केंद्रबिंदू

- **रस्ता रूंदीकरणाचा प्रश्न ऐरणीवर**
- **नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात**

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील निजामपूर बाजारपेठे ही वाढत्या अपघातांचे केंद्रबिंदू ठरली आहे. येथील अरुंद रस्त्यावरून दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या आणि स्थानिक नागरिकांच्या मनात भीतीचे सावट पसरले आहे. वाहतुकीच्या गर्दीतून मार्ग काढताना प्रत्येकाला अपघाताच्या धोक्याची जाणीव सतावत असते. नुकताच निजामपूर बाजारपेठेत पर्यटकांच्या कारने एका व्यक्तीला ठोकर देऊन अपघात केला होता. त्यामुळे बाजारपेठेसह या मार्गावर असणाऱ्या विविध गावांतील रस्ता रुंदीकरणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे या रस्त्याचे तातडीने रुंदीकरण व्हावे, यासाठी नागरिक अंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.



निजामपूर बाजारपेठेतील हा रस्ता महाराष्ट्र रस्ते विकास मंडळाकडे आहे. या मार्गाची भौगोलिक व वाहतूकदृष्ट्या महत्त्वाची भूमिका आहे. पुणे, मराठवाडा, विदर्भातून मोठ्या प्रमाणावर पर्यटक कोकणाच्या दिशेने याच मार्गाने येतात. विशेषतः सुट्ट्यांच्या हंगामात आणि सणावाराच्या काळात वाहतुकीचा ताण इतका वाढतो की, अरुंद रस्त्यावरून जाणे हे वाहनचालकांसाठी कसोटीचे ठरते. दुर्दैवाने, या ताणाचे रूपांतर वारंवार अपघातांत होत असून गेल्या काही महिन्यांत अपघातांच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे महामार्गाचे महत्त्व मान्य आहे; परंतु, बाजारपेठेतील हा जीवघेणा अरुंद भाग कधी रुंद होणार, हा प्रश्न प्रश्नच राहिला आहे. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास ही परिस्थिती आणखी बिकट होईल, असा इशारा नागरिक देत आहेत. नुकत्याच घडलेल्या भीषण घटनेने या प्रश्नाला अधिकच तीव्रता मिळाली आहे.

## ‘मंजुळाक्षरे’ काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

‘मंजुळाक्षरे’ म्हणजे मृदू आवाजात आलेली जणू मंजुळ अक्षरे आहेत, असे प्रतिपादन रायगड भूषण प्राध्यापक एल.बी. पाटील यांनी केले आहे. चिरनेर येथील कवयित्री मंजुळा म्हात्रे यांच्या ‘मंजुळाक्षरे’ या कविता संग्रहाचा प्रकाशन सोहळा रविवारी (दि.१०) पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या विद्या संकुलनातपार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ‘मंजुळाक्षरे’ काव्यसंग्रहाचे प्रकाशन उद्योगपती राजेंद्र खारपाटील यांच्या हस्ते करण्यात आले.




पुढे बोलताना एल.बी. पाटील म्हणाले की, मंजुळा म्हात्रे या कवयित्रीची ही कविता जन्मापासूनच कागदावर उतरली आहे. त्यांच्या कवितेचा गुरु कोण असेल, तर ती त्यांची आई आहे. आईनेच त्यांना कवितांच्या संस्कारांचे बालकडू पाजलेले आहे. म्हणूनच त्यांच्या कवितांमध्ये ठाई-ठाई प्रज्ञेचे प्रतिबिंब अनुभवला मिळते. त्यांचा कवितासंग्रह मातीशी नाते सांगणारा असून, मानवी मनाला हात घालणारा असून, नवतेचे शाल पांघरलेले विचार या कवितांमधून सर्वांनाच रोमांचित करतात, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाला उद्योगपती पी.पी. खारपाटील यांनी सदिच्छा भेट दिली. तर, व्यासपीठावर कवयित्री मंजुळा म्हात्रे यांच्यासह सरपंच भास्कर मोकल, उपसरपंच अरुण पाटील, माजी जि.प. सदस्य संतोष ठाकूर, शेकापचे तालुका चिटणीस सुरेश पाटील, संजय पाटील, अलंकार परदेशी, अनिल नारंगीकर, शेकापक्षाचे कार्यकर्ते नित्यानंद मोकल, निशिगंधा मोकल, सौरभ पाटील, राष्ट्रवादीचे संतोष ठाकूर यांच्यासह ग्रामस्थ व नातेवाईक उपस्थित होते.

## विजेच्या लपंडावामुळे कोलाडकर त्रस्त

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील खांब-कोलाड परिसरात महावितरण कंपनीकडून वारंवार वीज पुरवठा खंडित करण्यात येत आहे. त्यामुळे या परिसरातील व्यावसायिकांसहित नागरिक कमालीचे हैराण झाले आहेत. त्यामुळे महावितरण कंपनीच्या मनमानी कारभारावर संतापाची लाट उसळली आहे.




गौरी-गणपती उत्सव हा मोठ्या उत्सहात साजरा केला जातो. या उत्सवाला १५ दिवस शिल्लक असल्यामुळे या परिसरात रंगरंगोटी, डेकोरेशन यासाठी नागरिक कामाला लागले आहेत. परंतु, वारंवार विद्युत पुरवठा बंद होत असल्यामुळे नागरिकांच्या अडचणीत वाढ होतांना दिसत आहे. तसेच, शासकीय आणि निमशासकीय कार्यालये, बँका, झेरॉक्स सेंटर, ई सेवा केंद्र व घरगुती ग्राहकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. महावितरणच्या हलगर्जीपणामुळे सर्वसामान्य जनतेला त्रास सहन करावा लागत आहे. वीज पुरवठ्यातील या अनियमिततेमुळे कामांमध्ये अडथळे निर्माण होत असल्याचा संताप कोलाड परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## देशी दारूचा साठा हस्तगत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील पळस्पे, पुष्पक नगर व उसर्ली येथे पनवेल शहर पोलिसांच्या विशेष पथकाने टाकलेल्या धाडीमध्ये हजारो रुपये किमतीचा देशी दारूचा साठा हस्तगत केला आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली नेमलेल्या विशेष पथकाने गुप्त खात्याकडून मिळालेल्या माहितीनुसार पळस्पे, पुष्पक नगर व उसर्ली येथे धाड टाकली. या टाकलेल्या धाडीमध्ये पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने हजारो रुपये किमतीचा देशी दारूचा साठा हस्तगत केला आहे. त्यांच्या विरोधात कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**महिन्याभरात ३८ गंभीर गुन्हे उघडकीस | एकूण ७१ लाखांचा मुद्देमाल जप्त**

# पनवेल पोलिसांचा गुन्हेगारांनी घेतला धसका

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहर पोलीसांनी जुलै महिन्यामध्ये एक उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यात त्यांनी ३८ गंभीर गुन्हे उघडकीस आणले असून त्यातील ५७ जणांना गजाआड केले आहे. आतापर्यंत पोलिसांनी त्यांच्याकडून एकूण ७१ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यामुळे पनवेल शहरातील गुन्हेगारांनी याचा धसका घेतला आहे.

दरम्यान, पनवेल येथील एका कुटुंबाला शेतातून गुप्तधन काढून देण्याच्या बहाण्याने एका भोंदूबाबाने त्यांचे ३९ लाख ७० हजार रुपये किमतीचे सोने आणि रोख रकमेची फसवणूक केली होती. त्या भोंदूबाबाला पनवेल शहर पोलिसांनी कोल्हापूर जिल्ह्यातून अटक करून त्याने फसवणूक केलेले सर्व दागिने व रोख रक्कम जप्त केली आहे. दुसऱ्या गुन्ह्यात आयफोन चोरुन नेणाऱ्या चोरट्याचा पाठलाग करत ओडिशातील त्याच्या मूळगावी जाऊन अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी पुराने वेढलेल्या गावात फायर ब्रिगेडच्या मदतीने ८ किमी. पाण्यातून प्रवास करत त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ७ लाख २४ हजार ५०० रुपये किमतीचे ५ आयफोन जप्त केले. तिसऱ्या गुन्ह्यात पनवेल बस स्थानक परिसरात प्रवाशांना लिफ्ट देण्याच्या बहाण्याने लुटणाऱ्या टोळीला अटक केली आहे. त्यांच्याकडून २ लाख २७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, रेल्वे स्थानक परिसरात बॅग चोरणाऱ्या टोळीतील ५ आरोपींना अटक करण्यात आली असून ११ लाख ६७ हजार रुपये किमतींचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. त्याचबरोबर दुकानांचे शटर उचकटून चोरी करणाऱ्या टोळीला देखील ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून ४ लाख ९५ हजार ८१० रुपये किमतीचे ४५ मोबाईल जप्त केले आहेत. आणखी काही गुन्हे देखील उघडकीस आले आहेत.



> **पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या या यशस्वी कामगिरीचे संपूर्ण श्रेय आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाला आणि पोलीस पथकाच्या अथक परिश्रमाला जाते. वरिष्ठांच्या मार्गदर्शनामुळेच आम्ही एका महिन्यात ३८ गुन्हे उघडकीस आणून ५७ आरोपींना अटक करत त्यांच्या ताब्यातून ७१ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करू शकलो.**
> **– नितीन ठाकरे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पनवेल शहर**

या साऱ्या कारवाया नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहआयुक्त संजय येनपुरे, परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते आणि पनवेल विभागाचे सहाय्यक आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस कर्मचाऱ्यांनी ही कामगिरी यशस्वी केली आहे.

## खांदेश्वर पोलिसांची परवड

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सिडकोच्यावतीने २०१३ साली खांदा वसाहत येथे खांदेश्वर पोलीस ठाण्याची इमारत बांधण्यात आली होती. परंतु, अवघ्या काही वर्षांतच या इमारतीला समस्यांचे ग्रहण लागले. त्यामुळे या इमारतीतील पोलीस ठाणे सेक्टर ८ मधील एका तीन मजली बंगल्यात स्थलांतरित करण्यात आले होते. परंतु, आता ती जागा देखील अपूरी पडत आहे.




सिडकोच्यावतीने १२ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या नव्या इमारतीच्या पायथ्याखालून उंदीर पोखरणे, भिंतींना वाळवी लागणे आणि लाद्या वर येणे अशा गंभीर समस्या निर्माण झाल्या. परिणामी, या इमारतीत काम करणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी ती इमारत रिकामी करून सेक्टर ८ मधील एका तात्पुरत्या तीन मजली बंगल्यात पोलीस ठाणे स्थलांतरित करण्यात आले. सध्या या तात्पुरत्या ठिकाणी शंभरहून अधिक कर्मचारी काम करत असून बसण्यासाठी आणि विभाग चालवण्यासाठी पुरेशी जागा नाही. त्यामुळे जुनी धोकादायक इमारत पाडून किंवा नवीन पनवेल येथील नव्याने देण्यात आलेल्या भूखंडावर पोलीस चौकी उभारण्याची प्रक्रिया गतीमान करण्याची मागणी स्थानिक पातळीवर जोर धरत आहे.

# आयोगाची टाळाटाळ का?

राहुल गांधी यांनी मत-चोरीबाबत मोठा गौप्यस्फोट केला. शुक्रवारी बंगळुरुमध्ये त्यांनी जाहीर सभा घेतली. पण निवडणूक आयोगाची टाळाटाळ चालूच आहे. मध्य बंगळुरु लोकसभेमधील महादेवपुरा या विधानसभा मतदारसंघात एक लाख मतदारांबाबत राहुल यांनी शंका उपस्थित केली आहे. या मतदारांची यादी त्यांनी आयोगाकडूनच मिळवली होती. या यादीत पत्ते नसलेले, किंवा एकाच पत्त्यावर ५०-६० लोक राहत असल्याचे दाखवलेले किंवा एकाच व्यक्तीचे चार चार बूथवर नाव असलेले मतदार आहेत हे राहुल यांनी नावनिशीवार व आकडेवारी देऊन दाखवून दिले. शिवाय पहिल्यांदाच मतदान करणाऱ्यांसाठी असलेल्या फॉर्म सहाद्वारे तब्बल ३३ हजार मतदार नव्याने जोडले गेले व त्यांची वये ७० च्या पुढची आहेत याचे पुरावेही दिले. साहजिकच, हा मोठा घोटाळा आहे. दोन-पाच नावे चुकीची वा दोन ठिकाणी असल्याचे प्रकार अनेकदा घडतो. निवडणूक यादीतून नावे अचानक नावे गायब होण्याचे प्रकारही नेहमी होत असतात. पण त्या सर्वांहून कितीतरी प्रचंड असा हा घोटाळा आहे व तो जाणूनबुजून कोणीतरी केलेला असावा असा संशय येण्याला पुरेपूर जागा आहे. राहुल यांचा थेट आरोप असा आहे की, हा प्रकार भाजप आणि आयोग यांच्या संगनमताने झालेला आहे. तो समजा बाजूला ठेवू. पण मतदारयादीत इतक्या मोठ्या प्रमाणात भानगडी असतील तर तो आयोगाला बट्टा आहे. तो त्याने तात्काळ दूर करायला हवा. त्यासाठी राहुल यांनी अमुक नियमानुसार तमुक फॉर्म भरून द्यावा अशी मागणी आयोगाने करणे ही निव्वळ कारकुनी मनोवृत्ती आहे. निवडणूक आयोगासारख्या स्वायत्त संस्थेला ती शोभत नाही. राहुल हे प्रतिज्ञापत्र भरून देण्यास का तयार नाहीत असा सवाल करता येईल. भाजपवाले तो करीत आहेतच. पण राहुल यांनी जे म्हणायचे आहे ते जाहीरपणे मांडले आहे. त्यामुळे उद्या समजा खोटे ठरले तर त्यांच्याविरुध्द सहजपणे खोटी माहिती पसरवल्याचा खटला दाखल करता येईल. पण त्यांनी प्रतिज्ञापत्र न दिल्याने हा विषय असाच लटकत ठेवणे याचाच अर्थ या भानगडींबाबत लोकांच्या मनातील संशय असाच कायम ठेवणे होय.

## महाराष्ट्र विधानसभेची आठवण

अनेकदा माणसे घरे वा राहण्याचे ठिकाणे बदलतात. दर नवीन ठिकाणी नव्याने मतदान करतात. मतदारयादीतील जुने नाव काढून टाकत नाहीत. तसा अर्ज दिला तरी त्यावर कार्यवाही होतेच असे नाही. मृत झालेल्या हजारो नागरिकांची नावे आजही यादीत आढळून येतात. असेच प्रकार महादेवपुरामध्ये घडले असणार यात शंका नाही. पण फॉर्म सहाद्वारे नवे मतदार म्हणून वयस्करांची झालेली नोंदणी व बनावट पत्ते इत्यादींबाबतचे आरोप गंभीर आहेत. शिवाय, त्यांची संख्या तब्बल ३० ते ४० हजारांच्या घरात आहे. गेल्या लोकसभेला भाजपचा उमेदवार बरोबर ३२ हजारांच्या फरकानेच जिंकला आहे. त्यामुळे हा प्रकार भाजपने मुद्दाम घडवून आणला आहे की काय असे वाटायला पुरेपूर जागा आहे. त्याचा खुलासा करणे हे आयोगाचे कर्तव्य आहे. पण आयोग त्यापासून पळ काढू पाहतो आहे. साहजिकच तो कोण्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना आणि भाजपच्या कोण्या नेत्यांना वाचवू तर पाहत नाही ना असा संशय निर्माण होतो. हे प्रकार सरसकट घडलेले नाहीत हे उघड आहे. मात्र राहुल यांचा आरोप नेमका तोच आहे. काही ठराविक ठिकाणी असे प्रकार घडवून आणून एकूण निवडणुकीचा निकाल फिरवला गेला असे त्यांचे म्हणणे आहे. महाराष्ट्रातील लोकांनी तर याचा दारुण अनुभव गेल्याच वर्षी घेतला आहे. विधानसभा निवडणुकीत ज्या रीतीने विरोधकांचा पालापाचोळा झाला तो सर्वच प्रकार संशयास्पद होता. राज ठाकरे यांनी त्याचे वर्णन अविश्वसनीय अशा एकाच शब्दात केले होते. पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेस आणि शरद पवारांच्या पक्षाचा ज्या रीतीने सफाया झाला तो खरोखरच अकल्पनीय होता. सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये या पक्षांचा एकही आमदार जिंकू नये हे स्वातंत्र्यानंतर कधीही घडले नव्हते. नगरमध्ये बाळासाहेब थोरात वगैरेंचा पराभव किंवा मराठवाडा व कोकणातला ठाकरे सेनेचा पराभव हेही संदेहास्पद होते.

## न्यायालयात फेरविचार हवा

त्यामुळे बंगळुरुमध्ये करण्यात आलेली मतदारयादीची पडताळणी महाराष्ट्रातही केली जाण्याची गरज आहे. त्यासाठी सर्व पक्षातील लोकांनी पुढाकार घेऊन मोहिम राबवायला हवी. गेल्या वर्षीच्या निवडणुकीनंतर इव्हीएमबाबत शंका घेण्यात आल्या. इव्हीएम तपासणीची मागणी करण्यात आली. पण ती टिकू शकली नाही. कारण, इव्हीएममधून मतदान करताना काहीतरी घोटाळा केला जात असल्याचा उमेदवारांचा आरोप होता. प्रत्यक्षात त्या इव्हीएमच्या तपासणीच्या वेळी आधी डेटा रिकामा करून नंतर त्यांची खातरजमा करू दिली जाणार होती. तिला काहीच अर्थ नव्हता. पण या सर्वच उमेदवारांना मतदारयादीची मागणी करून तिच्यातच काही भानगड होती का हे तपासता येईल. नाहीतरी, महाराष्ट्रात लोकसभेनंतर अवघ्या चार महिन्यात तब्बल ७६ लाख नवीन मतदारांची नोंदणी झाल्याचे सांगण्यात येत होते व त्यावर वारंवार संशयही व्यक्त केला गेला आहे. सबब अतिशय प्राधान्याने या सर्व याद्यांची छाननी केली जाण्याची गरज आहे. तशी मागणी सर्व विरोधकांनी करायला हवी व त्यासाठी नव्याने आंदोलन उभे करायला हवे. गरज पडली तर पुन्हा एकदा न्यायालयात जाण्याचा मार्गही तपासून पाहायला हवा. दरम्यान, हे सर्व घडताना भाजपचे वर्तन पाहण्यासारखे आहे. त्यांनी राहुल यांच्यावरच वाटेल त्या थराला जाऊन आरोप केले आहेत. हा पक्ष स्वतःला जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीतला सर्वात मोठा पक्ष म्हणवतो. त्यांनी खरे तर या भानगडींची आयोगाने किंवा अन्य कोण्या संस्थेने निःपक्ष चौकशी करावी अशी मागणी करायला हवी. पण तो चुकूनही तो चौकशीचा शब्द तोंडातून काढत नाही. आयोगाकडे राहुल यांनी डिजिटल स्वरुपातला डेटा देण्याची मागणी केली आहे. त्यालाही भाजपचा आडून आडून विरोध चालू आहे. काँग्रेसने पूर्वी असे आरोप केले होते व कमलनाथ यांनी २०१८ मध्ये एक प्रकरण सर्वोच्च न्यायालयात नेले होते. तेथे डिजिटल स्वरुपात डेटा दिल्यास मतदारांचा खासगी तपशील उघड होईल असा बचाव निवडणूक आयोगाने केला होता. तो न्यायालयाने तेव्हा ग्राह्य मानला होता. पण आता या भानगडीचे प्रचंड स्वरुप लक्षात घेता त्या निर्णयाचा फेरविचार करण्याची गरज आहे. आपल्या लोकशाहीच्या व राजकीय पक्षांच्या विश्वासार्हतेचा प्रश्न लक्षात घेता भाजपसह सर्वच पक्षांनी न्यायालयाकडे अशी मागणी करायला हवी. प्रत्यक्षात निवडणूक आयोग आणि भाजपवाले एकाच रीतीची भाषा बोलत आहेत. त्यामुळे राहुल यांनी व्यक्त केलेल्या संशयाला आणखी बळकटी येत आहे.

विचार

# हायड्रोजनवर चालणारी वाहने

***गेल्या दशकापासून हायड्रोजन वायूवर चालणाऱ्या वाहनांवरील संशोधनाला गती मिळाली आहे. या पर्यायाकडे अनेकांच्या नजरा वळल्या आहेत. पर्यावरणाची हानी शक्य तितकी टाळणारी इंजिने (आणि इंधनेही) शोधण्याचे, बनवण्याचे आणि वापरण्याचे बंधन आता अनेक देशांनी आपापल्या वाहन उत्पादकांवर घातल्यामुळे या उद्योगक्षेत्रात मोठे बदल होऊ घातले आहेत. हायड्रोजन कार्स हे त्यातीलच एक महत्त्वाचे पाऊल आहे.***



**डॉ. दीपक शिकारपूर**

डिझेल, पेट्रोल, गॅससारख्या जैव-इंधनांच्या वाढत्या उपशामुळे आणि वापरामुळे पृथ्वीचे पर्यावरण धोक्यात आले आहे, येत आहे हे सर्वांना माहीतच आहे. चंगळवादी जीवनशैली बदलून मुळात खाजगी वाहनांचा वापर कमी करा, असे आवाहन सुरू होऊनही दोन दशके झाली; परंतु आपल्या सवयी बदलत नसल्याने वाहनांची विक्रीही वाढतेच आहे. त्यामुळे वाहनाच्या इंजिनच्याच स्वरूपात बदल करण्याबाबतचे संशोधन होऊन त्याला आलेले फळ म्हणजे इलेक्ट्रिक व्हेइकल्स उर्फ विजेवर (बॅटरीवर) चालणारी वाहने. गेल्या दशकात अशा वाहनांची संख्या जगभर वेगाने वाढली, परंतु त्यांच्याही काही मर्यादा आणि भविष्यात निर्माण होऊ शकणाऱ्या समस्या आता दिसू लागल्या आहेत.

पहिली बाब म्हणजे किंमत पारंपारिक वाहनांच्या तुलनेत इ-वाहने दीडपट दुप्पट महाग आहेत. पर्यावरणाची कितीही काळजी असली तरी ही जादा किंमत अनेकांना या वाहनांपासून दूर ठेवते आहे. दुसरा मुद्दा त्यांच्या 'रेंज'चा आहे. म्हणजेच एकदा बॅटरी चार्ज केल्यावर इ-वाहन कापू शकणारे अंतर. साधी इ-वाहने जेमतेम ७० ते ९० किमी. जातात, मग ती दुचाकी असोत वा चारचाकी. नवी आधुनिक वाहने ३०० किलोमीटरपर्यंतही जाऊ शकतात. पण त्यांच्या किमती खूपच जास्त आहेत. म्हणजे गोल फिरून आपण पुन्हा मूळ समस्येकडेच येतो. शिवाय बॅटरी चार्ज होण्याची क्रिया वाहन चालत असताना होत असते (मग ते पारंपारिक असो वा विजेवर चालणारे). अनेकजणांचे आठवड्यातून किमान दोनदा असे २००-३०० किलोमीटर दूर जाणे होते. पण अनेकजणांचे असे येणे-जाणे कमी असते. त्यामुळे बॅटरी आपोआप चार्ज होत नाही. परिणामी, बॅटरी चार्ज करण्यासाठी वेगळा वेळ द्यावा लागतो. चार्जिंग घरीही करता येते परंतु त्यासाठी काही तास लागतात. बाहेर हायवेवर अद्याप चार्जिंग स्टेशन्सची संख्या पेट्रोल पंपांच्या मानाने अगदीच नगण्य आहेत. त्यामुळे जगभरच्या अनेक वाहनचालकांवर सतत बॅटरी संपण्याची टांगती तलवार असते. बरे, ग्रामीण किंवा विरळ वस्तीच्या भागात चार्जिंगची सोडा, विजेच्या उपलब्धतेचीच हमी नसल्याने तूर्त तरी इ-वाहने शहरी भागांमध्येच अडकली आहेत.

डिझेलचा बराचसा वापर व्यापारी कारणांसाठी म्हणजे मालवाहतुकीसाठी केला जातो. त्यामुळे ट्रक्स विजेवर चालू शकले तर जैवइंधनांची बरीच बचत होईल. परंतु या रूपांतरणाचा खर्च खूप आहे. शिवाय रेंजची समस्या कायमच असल्याने मालवाहतूकदार या वाहनांसाठी फारसे उत्सुक नाहीत. विजेवरची वाहने वापरात आलेल्याला आता एक दशक झाले असून आता एक वेगळीच समस्या समोर येत आहे. या वाहनांमधील बॅटरी विशिष्ट प्रकारची असते. म्हणजे हमरस्त्यावरील बॅटरीच्या दुकानात मिळणारी नेहमीची बॅटरी यांना चालत नाही. यासाठीची वेगळी बॅटरी अत्यंत महाग तर आहेच, शिवाय तिचा पूर्णपणे पुनर्वापर करण्याचे म्हणजे ती रीसायकल करण्याचे मार्ग अद्याप दृष्टीपथात आलेले नाहीत. याचा अर्थ, लक्षावधी इलेक्ट्रिक गाड्यांच्या तितक्याच निरूपयोगी बॅटऱ्यांच्या घातक कचऱ्याचे करायचे काय? पर्यावरणपूरक म्हणून विजेवरील वाहन वापरायचे आणि त्याची निरूपयोगी बॅटरी मात्र पर्यावरणाचे नुकसान करणार, अशी ही विचित्र परिस्थिती आहे!

...तर हे झाले विजेवरील वाहनांचे तोटे आणि मर्यादा. गेल्या दशकापासून मात्र हायड्रोजन वायूवर चालणाऱ्या वाहनांवरील संशोधनाला गती मिळाली आहे. अद्याप यांचा इलेक्ट्रिक कार्सइतका बोलबाला नसला तरी बीएमडब्ल्यू आणि स्टोलांटिस या मोठ्या कंपन्यांनी याबाबतच्या संशोधन आणि विकास कार्यक्रमांमध्ये मोठी गुंतवणूक केल्याने या क्षेत्राकडे अनेकांच्या नजरा वळल्या आहेत. कमीत कमी धूर सोडून पर्यावरणाची हानी शक्य तितकी टाळणारी इंजिने (आणि इंधनेही) शोधण्याचे, बनवण्याचे व वापरण्याचे बंधन आता अनेक देशांनी आपापल्या वाहनउत्पादकांवर घातले आहे. त्यामुळे वाहन उद्योगाच्या पारंपारिक चित्रात आणि एकंदर रचनेमध्ये मोठे बदल होऊ घातले आहेत. हायड्रोजन कार्स हे त्यामधीलच एक महत्त्वाचे पाऊल आहे. सध्या जागतिक स्तरावर विविध कारणांमुळे आर्थिक मंदीचे सावट आहे आणि सर्वत्र महागाई वेगाने वाढते आहे. यामध्ये सामान्य नागरिकांना त्रास देणारा घटक म्हणजे इंधनाचे दर. अशा परिस्थितीत हायड्रोजनसारख्या पर्यायी इंधनाकडे वापरकर्त्यांचे लक्ष वळणेही स्वाभाविक आहे. विजेवरील वाहनांच्या निर्मितीमागे खंबीरपणे उभ्या असलेल्या फोक्सवॅगनसारख्या कंपनीनेही एकदा टाकी फुल केल्यावर गाडीला तब्बल २००० किलोमीटर नेऊ शकेल असा 'फ्युएल सेल' बनवण्याच्या दिशेने संशोधन आरंभले आहे. बीएमडब्ल्यूचे सीईओ ऑलिव्हर झिप्स ह्यांनी '२०३० च्या आत आपली हायड्रोजन वाहने अमेरिकेत विक्रीला उपलब्ध होतील' असे सांगितले आहे. युरोपीय महासंघानेही यासंदर्भात दोन महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. हायड्रोजनवर चालणाऱ्या ट्रक्सना उत्तेजन देणे आणि हायड्रोजन भरण्याची सोय दर शंभर किलोमीटरवर करून देणे. वाहनांची संख्या (पर्यायाने प्रदूषण) भरपूर असलेल्या चीनमध्येही २०३० पर्यंत सुमारे एक लाख (फ्युएल सेल इलेक्ट्रिक व्हेइकल) रस्त्यांवर आणण्याची योजना आहे. कार्बन-उत्सर्जनाचे प्रमाण शून्यावर आणायचे असेल (नेट झीरो २ पॉलिसी) तर हायड्रोजनपासून सुरूवात करावी लागेल, असे बहुतेक वाहनतज्ज्ञांचे मत आहे. न्यू ऑटोमोटिव्ह अँड मोबिलिटी एक्स्प्लोरेशनच्या सांगण्यानुसार त्यांनी फ्युएल सेल तंत्रज्ञानावरील वाहनांच्या रीफ्युएलिंग उर्फ पुनर्भरणाचा प्रश्न वेगळ्या प्रकारे सोडवला आहे. त्यांनी आपल्या गाडीला हायड्रोजनच्या दोन टाक्या दिल्या आहेत त्यापैकी एक 'फिक्स्ड' आहे (इतर वाहनांप्रमाणे) परंतु दुसरीमध्ये हायड्रोजनने भरलेल्या, बाहेर काढण्याजोग्या सहा कॅप्सूल्स बसवल्या आहेत. या कॅप्सूल्स विविध दुकानांमार्फत सुट्या विकत मिळण्याची सोय कंपनी करत आहे. म्हणजेच ही टाकी भरण्यासाठी 'हायड्रोजन पंपा'वर थांबण्याची गरज नाही. दोन्ही टाक्या भरलेल्या असल्या की ही गाडी साडेसातशे किलोमीटर अंतर कापू शकेल. ही कार २०२६ नंतर बाजारात येणार आहे.

'केपजेमिनी' या सल्लासेवा देणाऱ्या प्रसिद्ध कंपनीच्या वाहन विभागाचे मुख्य अलेक्झांडर ऑदिन यांचा विश्वास आहे की फ्युएल सेलचे तंत्र व्यापारी वाहने आणि मोठ्या गाड्यांप्रमाणेच दैनंदिन वापराच्या छोट्या गाड्यांमध्येही यशस्वीरीत्या वापरता येईल. भावी वाहन उद्योगात अशा गाड्यांचा मोठा वाटा असेल असे त्यांना वाटते. ही हायड्रोजन कार कशी चालते, हे समजून घेणे महत्वाचे आहे. इथे हायड्रोजन पेट्रोलप्रमाणे थेट जाळला जात नाही तर त्यातील रासायनिक ऊर्जेचे रूपांतर विजेमध्ये केले जाते. या विजेवर गाडीची चाके फिरवली जातात. मुख्य म्हणजे या वाहनाच्या एक्झॉस्ट पाइपमधून धूर नाही तर चक्क पाणी बाहेर येते, परिणामी प्रदूषण शून्य. फ्युएल सेलची रचना बॅटरीसारखीच असते. एका बाजूने हायड्रोजन आत सोडला जातो. तो तेथील कारक रसायनाच्या (कॅटेलिस्ट) संपर्कात येतो आणि हायड्रोजनच्या अणूंचे इलेक्ट्रॉन आणि प्रोटॉन या कणांमध्ये विभाजन होते. हे इलेक्ट्रॉन वाहनामधील उच्च वीजदाबाच्या रचनेमधून जाऊन वाहनाच्या बॅटरीला किंवा थेट वाहनाला ऊर्जा पुरवतात. हा, आता कोणी म्हणेल की यातही बॅटरी आहेच, तीही कालांतराने फेकून द्यावी लागणार. मग तिचे प्रदूषण होणारच की... पण ही बॅटरी वेगळ्या प्रकारची असते आणि तिचा जवळजवळ ९० टक्के पुनर्वापर करता येतो असे तिच्या निर्मात्यांचे म्हणणे आहे. हायड्रोजन तीन प्रकारे मिळतो. पेट्रोलियमच्या उत्पादन प्रक्रियेतून, कोळशापासून आणि पाणी व सेंद्रीय कचऱ्यातून. हा तिसरा हायड्रोजन 'ग्रीन' म्हणजेच पर्यावरणस्नेही असल्याने त्याचा वापर या वाहनांसाठी केला जातो.

२०२२ च्या मध्यावर टोयोटाने आपली 'मिराइ' ही भारतातील पहिली हायड्रोजन कार सादर केली. मंत्रीमहोदय नितीन गडकरी यांनी संसद भवनापर्यंतचा प्रवास या गाडीमधून केला. या सर्व नवसंशोधनांकडे पाहताना म्हणता येईल की कोणतेही एक तंत्रज्ञान श्रेष्ठ मानून त्याचाच वापर करण्याचा आग्रह धरण्यापेक्षा विविध सर्वोत्तम तंत्रांचे एकत्रीकरण करून पर्यावरणरक्षणाचा अंतिम हेतू साध्य करणे महत्त्वाचे आहे.

deepak@deepakshikarpur.com

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

चर्चा आजची

# रेल्वेची रो-रो सेवा म्हणजे चाकरमान्यांच्या खिशाला भुर्दंड

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकण रेल्वे मार्गावर रेल्वेतून चारचाकी गाड्या घेऊन जाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. मात्र या सुविधेचा लाभ घेण्यासाठी गणेशभक्तांना मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार आहे. शिवाय प्रवासासाठी जास्त वेळही खर्च करावा लागणार आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सुरू होणाऱ्या या सेवेचा कोकणातील प्रवाशांना नेमका काय लाभ होणार याबाबत साशंकता आहे.

कोकण रेल्वे मार्गावर रो-रो कार सेवा सुरू करण्याची घोषणा कोकण रेल्वेने केली आहे. २३ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर या कालावधीत प्रायोगिक तत्त्वावर ही 'रोल ऑन रोल ऑफ' (रो-रो) सेवा चालवली जाणार आहे. या रेल्वेगाडीतून चार चाकी मोटारी थेट गोव्यापर्यंत घेऊन जाता येणार आहेत. रायगड जिल्ह्यातील कोलाड ते गोव्यातील वेरणा दरम्यान ही रो-रो सेवा चालवली जाणार असून, रेल्वेकडून आरक्षण प्रक्रिया सुरू झाली आहे. एका वेळी चाळीस गाड्या या रो-रो रेल्वे सेवेने घेऊन जाता येणार आहे. पूर्वी मालवाहतूक करणाऱ्या ट्रक्ससाठी ही सुविधा उपलब्ध होती. यंदा मात्र प्रथमच खाजगी चार चाकी वाहनांसाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र प्रवासी संघटनांनी या सेवेला विरोध दर्शविला आहे

कोकण रेल्वेने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर 'रोल ऑन रोल ऑफ' सेवेची घोषणा केली आहे. प्रवाशांना त्यांचे चारचाकी वाहन रेल्वेतून थेट गोव्यापर्यंत नेण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. रायगड जिल्ह्यातील कोलाडपासून गोव्यातील वेरणापर्यंत ही सुविधा देण्यात आली आहे, ज्यासाठी आरक्षण सुविधा सुरू करण्यात आली आहे. २३ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर या कालावधीत ही विशेष रो-रो सेवा गाडी चालवली जाणार आहे. मात्र यासाठी प्रवाशांना मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार आहे.

कोलाड ते वेरणा दरम्यान प्रवासासाठी १२ तासांचा कालावधी लागणार आहे. मात्र या प्रवासासाठी आपले वाहन घेऊन किमान तीन तास आधी कोलाड येथे दाखल होणे अपेक्षित आहे. याशिवाय मुंबईतून कोलाड येथे पोहोचण्यासाठी अडीच ते तीन तासांचा प्रवास करावा लागणार आहे. गोव्यातून तळकोकणात येण्यासाठी पुन्हा तास-दीड तासाचा प्रवास करावा लागणार आहे. त्यामुळे किमान २० तासांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

रो-रो सेवेचा लाभ घेण्यासाठी प्रवाशांवर अनेक जाचक अटी टाकण्यात आल्या आहेत. एका वेळेस चाळीस वाहनेच

**सुयोग आंग्रे**

या रो-रो सेवेतून नेली जाणार आहे. किमान १६ वाहनांचे आरक्षण झाले नाही तर त्या दिवशी ही रेल्वे रद्द केली जाणार आहे. रो-रो सेवेचा लाभ घेण्यासाठी प्रवाशांना गाडीसह किमान तीन तास आधी कोलाड येथे दाखल व्हावे लागणार आहे. एका गाडीसोबत तीनच प्रवाशांना प्रवास करता येणार आहे. त्यातील दोघांना वातानुकूलित डब्यात तर चालकाला द्वितीय श्रेणी डब्यात बसावे लागणार आहे. महत्त्वाची बाब म्हणजे त्यासाठी स्वतंत्र प्रवास भाडे आकारले जाणार आहे. त्यामुळे कुंटुंबात तीन पेक्षा जास्त सदस्य असतील तर त्यांना प्रवासासाठी वेगळी व्यवस्था करावी लागणार आहे.

रो-रो सेवेचा लाभ घेणासाठी प्रत्येक वाहनामागे ७ हजार ८७५ रुपये इतके भाडे आकारले जाणार आहे. तर वातानुकूलित डब्यातून प्रवास करणाऱ्या दोन प्रवाशांसाठी ९३५ रुपये प्रत्येकी भाडे आकरले जाणार आहे. तर द्वितीय श्रेणीतून प्रवास करणाऱ्या चालकासाठी १९० रुपये दर आकारले जाणार आहे. त्यामुळे एका कुटुंबाला एका बाजूच्या प्रवासासाठी जवळपास दहा हजार रुपये खर्च येणार आहे. याशिवाय मुंबईतून कोलाडपर्यंत आणि वेरणाहून कोकणातील गावापर्यंत इंधन खर्च वेगळा करावा लागणार आहे. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या ही सेवा परवडणार नाही. प्रवासासाठी इतर प्रवासी रेल्वेच्या तुलनेत या गाडीला जादा वेळ लागणार असल्यानेही प्रवाशांसाठी ही सेवा अव्यवहार्य असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.तीन पैकी दोन प्रवाश्यांना वातानुकूलीत थर्ड एसी डब्यातून, तर तिसऱ्या प्रवाश्याला द्वितीय श्रेणी डब्यातून प्रवास करावा लागणार आहे. वातानुकूलित डब्यातून प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांसाठी ९३५ रुपये तर व्दितीय श्रेणी डब्यातून प्रवास करणाऱ्या तिसऱ्या प्रवाश्यासाठी १९० रुपये तिकीट आकारले जाणार आहे. त्यामुळे तीन जणांना गाडीसह प्रवासाठी जवळपास दहा हजार खर्च करावा लागणार आहे. या मुंबईतून कोलाड पर्यंत, आणि वेरणाहून सिंधुदुर्गात आपल्या गावी जाण्यासाठी दोन्ही बाजूने शंभर किलोमीटरचे अंतर पार गाडीने पार करावे लागणार आहे. ज्यासाठी अतिरिक्त प्रवास खर्च वाहनचालकांना सोसावा लागणार आहे. त्यामुळे या रो रो सेवेचा लाभ घेणे ही एक खर्चिक बाब ठरणार आहे.

लोकसंसद

# आरोग्याला घातक आणि उपद्रवी कबुतरखाने हटवलेच पाहिजेत



मुंबई शहरातील कबुतरखान्यांमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्यामुळे शासनाच्या आदेशानुसार मुंबई महापालिकेने महापालिका क्षेत्रातील सर्व कबुतरखाने तात्काळ बंद करण्यासाठी विशेष मोहीम राबवली आणि विशेषतः दादर येथील बहुचर्चित आणि सर्वाधिक उपद्रव मूल्य असलेला कबुतरखाना कबुतरे येऊ नयेत म्हणून ताडपत्रीने झाकून टाकला. या ठिकाणी दाणे टाकायचे बंद केल्यामुळे हळूहळू येथे कबुतरांनी येथे येणे बंद केले असते आणि नागरिकांची कबुतरांच्या 'जाचा'तून सुटका झाली असती. परंतु त्यानंतर जे घडले ते अनपेक्षित आणि आश्चर्यकारक होते. एका अहिंसक म्हणवल्या जाणाऱ्या धर्मियांच्या अतिरेकी अनुयायांनी हिंसक प्रवृत्तीचे दर्शन घडवत चाकू सुरे घेऊन तेथील बांबू आणि ताडपत्री उखडून टाकली आणि कबुतरांसाठी गोणी भरून दाणे तेथे टाकले. शासनाचे, महापालिकेचे, न्यायपालिकेचे आदेश धुडकावणाऱ्या या अहिंसक अनुयायांनी सार्वजनिक ठिकाणांचा स्वधर्माच्या प्रथा पाळण्यासाठी वापर करणे हे कितपत योग्य आहे ते एकदा गांभीर्याने ठरवले पाहिजे. येथे एक अलीकडचेच उदाहरण देण्यासारखे आहे. मुंबईच्या पवईच्या आयआयटीजवळ जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावर (जेव्हीएलआर) १९२५ सालापासून २०१७ पर्यंत ९२ वर्षे एक मारुती मंदिर अस्तित्वात होते. जेव्हीएलआरच्या विस्ताराच्यावेळी ते मंदिर नेमके रस्त्याच्या मधोमध आल्यामुळे कोणाचाही मुलाहिजा न ठेवता ते तेथून हटवले गेले. जर सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून रस्त्याच्या आड येणारी धार्मिक स्थळे अशाप्रकारे कोणाचाही मुलाहिजा न ठेवता बिनदिक्कतपणे हटवली जाऊ शकतात तर भर रस्त्यातील, बाजारातील आरोग्याला घातक आणि उपद्रवी कबुतरखानेही हटवले गेले पाहिजेत. एकाला एक न्याय आणि दुसऱ्याला एक न्याय हे योग्य ठरणार नाही.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# खुदीराम बोसः देशासाठी शहीद झालेले पहिले क्रांतिकारक

ज्या वयात तरुण पिढी भावी आयुष्याची स्वप्न रंगवत असतात त्या वयात त्यांनी त्याचं पूर्ण आयुष्य देशासाठी पणाला लावलं. ते थोर क्रांतिकारक म्हणजे खुदीराम बोस. बोस यांचा जन्म ३ डिसेंबर १८८९साली बंगालमधील मिदनापूर जिल्ह्यातील हबीबपूर गावात झाला. आई-वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या मोठ्या बहिणीनं त्यांचा सांभाळ केला. बंगालची फाळणी झाल्यानंतर बोस यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. सत्येन बोस यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी त्यांचं क्रांतिकारी जीवन सुरू केलं. नववीत असताना त्यांनी शाळा सोडली आणि त्यांचा पूर्ण वेळ देशासाठी दिला.



२८ फेब्रुवारी १९०६ साली सोनार बंगला नावाचं एक जाहिरात पत्रक वाटत असताना बोस यांना पोलिसांनी पकडले. दरम्यान बोस यांनी हुशारीनं त्यांना चकमा देत तिथून पळ काढला. त्यानंतर १६ मे १९०६ रोजी पोलिसांनी त्यांना अटक केली पण अल्पवयीन असल्या कारणाने त्यांना समज देऊन त्यांना सोडण्यात. ६ डिसेंबर १९०७ मध्ये बंगालमध्ये नारायणगड रेल्वे स्थानकावर झालेल्या बॉम्बस्फोटाच्या कटात बोस यांचा सहभाग होता. किंग्सफोर्ड चीफ प्रेसिडेंसी मॅजिस्ट्रेट हे क्रुर अधिकारी म्हणून ओळखले जातं होते. फक्त क्रांतिकारकांना त्रास देणं हा त्यांच्या मुळं उद्देश होता. म्हणून क्रांतिकारकांनी त्यांची हत्या करण्याचा कट योजना आखली. युगांतर क्रांतिकारी दलाचे नेते वीरेंद्र कुमार यांनी किंग्सफोर्डच्या हत्येची कामगिरी खुदीराम बोस आणि प्रफुल्ल चंद यांच्याकडं सोपवली.

प्रफुल्ल चंद आणि खुदीराम बोस दोघं किंग्सफोर्डला मारण्यासाठी बिहारला रवाना झाले. बिहारला पोहचल्यानंतर आठ दिवस त्यांनी किंग्सफोर्ड आणि त्यांच्या कुटुंबावर पाळत ठेवली. ३० एप्रिल १९०८ साली रात्री साडे आठच्या दरम्यान किंग्सफोर्डच्या बग्गीवर बॉम्ब हल्ला केला पण त्यांचा अंदाज चुकला आणि त्या हल्ल्यात किंग्सफर्डची पत्नी आणि मुलीचा मृत्यू झाला. हल्ल्यात किंग्सफोर्डचा मृत्यू झाला असं समजून दोघांनीही तिथून पळ काढला आणि पूसा रेल्वे स्थानकात पोहचले. रेल्वे स्थानकात पोहचल्यानंतर त्यांच्या हालचालीवरून पोलिसांना संशय आला आणि तिथेच त्यांना घेरण्यात आलं. आता आपल्याला अटक होणार हे जाणताच प्रफुल्ल चंद यांनी स्वतःवर गोळी झाडली तर खुदीराम बोस यांना पोलिसांनी अटक केली. बोस यांच्यावर हत्येचा खटला दाखल करण्यात आला. केवळ पाच दिवस चाललेल्या या खटल्यात त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांनी ही त्यांचा गुन्हा कबुल करत फाशीची शिक्षा स्वीकारली. ११ ऑगस्ट १९०८ साली त्यांना फासावर चढवण्यात आलं. त्यांच्या स्मरणार्थ पुसा रेल्वे स्थानकाचं नाव खुदीराम बोस स्थानक करण्यात आलं आहे. खुदीराम बोस यांच्या फाशीनंतर बंगालमध्ये त्यांची लोकप्रियता वाढली. बंगालमधील जुलाह भागात एक खास धोतर बनवण्यात आलं या धोतराच्या काठावर खुदीराम असं लिहिलं होतं. स्वातंत्र्य चळवळीत प्राणाची आहुती देणारे खुदीराम बोस पहिले क्रांतिकारक होते.

# सरकारचे शेतकऱ्यांना कर्जमाफीचे गाजर

## ● केंद्र सरकारकडून साखर कारखान्यांना थकहमी; शेतकऱ्यांच्या कर्जाचीही जबाबदारी घेण्याची मागणी

। मुंबई । प्रतिनिधी ।

**विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीचे गाजर दाखवले होते. मात्र, ही कर्जमाफी अद्यापही केवळ आश्वासनापुरतीच मर्यादित राहिला आहे. ज्या पद्धतीने साखर कारखान्यांनी केंद्र सरकारकडून घेतलेल्या कर्जाला राज्य शासनाने थकहमी दिली, त्याच धर्तीवर शेतकऱ्यांच्या कर्जाचीही शासनाने जबाबदारी घ्यावी, अशी मागणी राज्यातील शेतकऱ्यांकडून होत आहे.**



कर्जमाफी होणार या अपेक्षेने राज्यातील शेतकऱ्यांनी ३७ हजार ३९२ कोटी रुपयांच्या कर्जाची परतफेड केलेली नाही. त्यामुळे या कर्जाचा संबंधित बँकांवर बोजा पडला आहे. त्यामुळे जिल्हा सहकारी, राष्ट्रीयीकृत, ग्रामीण आणि खासगी बँका अडचणीत आल्या आहेत. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीची घोषणा केली होती. मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, अद्यापही या घोषणेकडे दुर्लक्ष केले जात आहे. राज्य शासनाकडून निधी नसल्याचे कारण पुढे करून कर्जमाफीची टोलवाटोलवी केली जात आहे.

दरम्यान, कर्जमाफी होईल या आशेने शेतकऱ्यांनी गेल्यावर्षी घेतलेले आणि यावर्षी परतफेड कराव्या लागणाऱ्या कर्जाची परतफेड केलेली नाही. कोल्हापूर जिल्हा वगळता इतर जिल्ह्यांत कर्ज परतफेडीची खूपच बिकट परिस्थिती आहे. त्यामुळे राज्य शासनाला राज्यातील सर्वच शेतकऱ्यांनी घेतलेले पीककर्ज स्वत: परतफेड करण्याची हमी घ्यावी लागणार आहे.

राज्यातील साखर कारखान्यांकडून घेतलेल्या कर्ज परतफेडीला राज्य शासन ज्याप्रमाणे हमी देते, त्याप्रमाणे शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन ते कर्ज परतफेड करण्याची शासनला हमी घ्यावी लागणार असल्याचे चित्र आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील १३ साखर कारखान्यांना १,८९८ कोटी रुपयांचे मार्जिन लोन उपलब्ध करून दिले आहे. तर, कोल्हापूर जिल्ह्यातील नऊ साखर कारखान्यांना १,१०० कोटी रुपयांच्या कर्जाला थकहमी देण्याचा निर्णय घेतला होता. याच पद्धतीने महायुती सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी देण्यासाठी शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड न करता ते कर्ज शासन देईल, अशी हमी घेऊन नवीन-जुने कर्ज वसूल करू नये, अशी मागणी होत आहे.

> “शेतकरी आजही कर्जमाफीच्या अपेक्षेवर जगत आहे. जर सरकारने साखर कारखान्यांसाठी हात पुढे केला असेल, तर शेतकऱ्यांसाठीही तोच न्याय लागू व्हावा, अशी मागणी होत आहे. राज्य सरकार साखर कारखान्यांच्या कर्जाची हमी घेते, मग आमच्या पीक कर्जाची का नाही? आम्ही गरीब, कष्टकरी शेतकरी आहोत. आमच्यासाठीही शासनाने कर्जाची हमी घ्यावी.”
>
> **– तानाजी पाटील, शेतकरी**

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

११ ऑगस्ट

१) श्री. रणजित बाळाराम पाटील अलिबाग, ११-८-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**जुनेद अल्ताफ घट्टे, वाढदिवस अलिबाग**



**द्रौपदी धर्मा कदम, स्मरणार्थ अलिबाग**

## सुवर्णकण



सर्वांचे सुख हेच माझे सुख
असे वाटणे हे अतीव महत्वाचे आहे
जगेसी जुनाट सोयरीक अशी वृत्ती
तयार झाली तरच हरीची समाधी लागेल

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

---



# प्लास्टिक ध्वज विक्रीवर बंदीची मागणी

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

१५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दिवशी देशाचा राष्ट्रध्वज मोठ्या अभिमानाने फडकवला जातो; मात्र, हाच राष्ट्रध्वज त्याच दिवशी रस्त्यावर, कचरापेटीत, गटारात व अन्यत्र फाटलेल्या अवस्थेत आढळतो. प्लास्टिकचे ध्वज लगेच नष्ट न झाल्याने या राष्ट्रध्वजांची विटंबना अनेक दिवस पहावी लागते. राष्ट्रध्वजाची ही विटंबना रोखण्यासाठी पोलिसांनी बंदी घातलेले प्लास्टिकचे ध्वज विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.

‘झंडा उँचा रहे हमारा’, असे अभिमानाने म्हटले जाते; परंतु, त्याचवेळी लहान मुलांच्या हट्टापोटी खेळण्यासाठी घेतलेले किंवा वाहनांवर लावण्यासाठी घेतलेले कागदी आणि प्लास्टिकचे झेंडे रस्त्यावर पडलेले पहायला मिळतात. त्याने राष्ट्रध्वजाचा घोर अवमान होत आहे. क्रांतिकारकांनी जो ध्वज भूमीवर पडू नये, यासाठी लाठ्या खाल्ल्या, वेळप्रसंगी प्राणाचेही बलिदान दिले, त्यांच्या बलिदानाची ही क्रूर चेष्टाच नव्हे का? राष्ट्रध्वजाचा मान राखणे, हे राष्ट्रीय कर्तव्य आहे, असे यावेळी समितीच्यावतीने निवेदनात जनतेलाही आवाहन करण्यात आले आहे आहे.

# प्रधानमंत्री किसान ‘अपमान’ योजना

## पंजाबराव पाटील यांचे टीकास्त्र

**। कराड । प्रतिनिधी ।**

देशात सरकारकडून शेतकऱ्यांना शेती उत्पादन खर्चासाठी अनुदान नाही, योग्य हमीभावही मिळत नाही. त्यामुळे कर्जबाजारीपणातून शेतकरी आत्महत्या करत आहेत. भविष्यात शेती व्यवस्था टिकेल का? हा शेतकऱ्यांपुढे प्रश्न आहे. ‘प्रधानमंत्री किसान सन्मान योजना’ ही तर शेतकरी अपमान योजना असल्याचे टीकास्त्र बळीराजा शेतकरी संघटनेचे प्रमुख पंजाबराव पाटील यांनी पत्रकार परिषदेत सोडले आहे.




यावेळी बोलताना पंजाबराव म्हणाले की, शेतकऱ्यांच्या योजनांची अंमलबजावणी होत नाही. एकेकाळी देशात उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी, अशी अवस्था होती. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्याचा शेतकऱ्यांना कोणताही फायदा मिळाला नाही आणि आता या उलट परिस्थिती झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा २०वा हप्ता २ हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केला. त्यातून शेतीला खते, बियाणे, कीटकनाशके आणि शेतीच्या कामाला मदत मिळेल, असे मुलाखतीत सांगितले. या योजनेचे आता पोलखोल करण्याची वेळ आली आहे. सध्या प्रधानमंत्री किसान योजनेतून वर्षाला तीन वेळा २ हजार रुपयांप्रमाणे ६ हजार रुपये शेतकऱ्यांना दिले जातात. या ६ हजारांत ६ गुंठेही शेती करता येत नाही. मग प्रधानमंत्री किसान योजनेच्या मदतीचा शेतकऱ्यांना किती फायदा मिळणार? ही मिळालेली मदत शेतात खर्च करून मिळालेल्या उत्पादनाला केलेल्या खर्चापेक्षा कमी भाव मिळाला, तर याचा शेतकऱ्याला एक रुपयाचाही फायदा झाला नाही, हे सत्य आहे. सरकारला द्यायचेच असेल तर शेतकऱ्यांनी घाम गाळून पिकविलेल्या शेतीमालाला उत्पादनाच्या खर्चाच्या दीड पट हमीभाव द्यावा, अशी मागणी असल्याचे पंजाबरावांनी बोलतान केली आहे. त्यामुळे ‘प्रधानमंत्री किसान सन्मान योजना’ ही शेतकऱ्यांचा सन्मान नसून अपमान योजना आहे, असे टिकास्त्र पंजाबराव पाटील यांनी सोडले आहे.

---

## उल्हासनगरातून अंमली पदार्थ जप्त

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

उल्हासनगर पोलिसांनी १३१ ग्रॅम वजनाचा एमडी हा अंमली पदार्थ विक्री करण्याकरता आलेल्या एका महिलेसह चार जणांना ताब्यात घेतले. यात एका नायजेरियन नागरिकांचा समावेश आहे. पोलिसांनी सापळा रचून नौशिन मैनुद्दीन शेख (२६) या महिलेला ताब्यात घेतले. तिच्याकडून ७१.०३ ग्राम वजनाचे एमडी या अंमली पदार्थासह १४ लाख ३१ हजार १२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर, इतर चार साथीदारांकडून ६० ग्राम मेफेड्रोन जप्त करण्यात आले आहे. या छाप्यात एकूण २६ लाख ३१ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# राजू पाटलांची ‘बालक’मंत्र्यांवर तीव्र नाराजी

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

कल्याण ते शीळफाटा रस्त्यावर शनिवारी सकाळपासून मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. रक्षाबंधन आणि सलग सुट्ट्या आल्यामुळे नागरिक मोठ्या प्रमाणात बाहेर पडले आणि त्यामुळे कोंडीत अडकले. भावाकडे रक्षाबंधनसाठी निघालेल्या लाडक्या बहिणी देखील या कोंडीत अडकल्या. तीन ते चार तास वाहने कोंडीत अडकून पडली होती. सर्वसामान्य नागरिकांसोबतच रुग्णवाहिकांना देखील याचा फटका बसला. यावर मनसे नेते राजू पाटलांनी नाराजी व्यक्त केली आहे.



कल्याण ते शीळफाटा रस्त्यावर मेट्रोचे काम सुरु असल्याने दररोज सकाळ संध्याकाळ या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. देसाई खाडी ते पलावा जंक्शन, काटई नाका, विको नाका हा भाग वाहनांनी पूर्णपणे व्यापलेला असतो. पलावा जंक्शन येथील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी देसाई खाडी ते काटई नाका या नवीन पुलाची उभारणी करण्यात आली. यामुळे पलावा जंक्शनमधील कोंडी कमी होईल, असा दावा सत्ताधाऱ्यांनी केला होता. मात्र, शनिवारी रक्षाबंधनला हा दावा देखील फोल ठरला. यावर मनसे नेते राजू पाटलांनी ट्विट करत मोठी नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, रक्षाबंधनाच्या दिवशी नागरिकांना वाहतूक कोंडीचे आंदण आहे. वर्षानुवर्षे तोच रस्ता, तेच ट्रॅफिक, तीच घुसमट आणि तीच मागणी. आता आम्हालाही त्याच त्याच मुद्द्यावरून सरकारला शालजोडीत द्यायला लाज वाटू लागली आहे. परंतु, त्यांना नागरिकांच्या जीवाची, वेळेची आणि जीवनाची काहीही एक पडलेली नाही. रस्ते रुंदीकरण केले, कितीतरी पुल बांधले. त्याचा मलिदा खाऊन झाला. पुन्हा रस्ते आणि पूल दुरुस्त करण्याची वेळ आली. म्हणजे पुन्हा मलिदा खाण्याची संधी उपलब्ध झाली. मात्र, वाहतुक कोंडीचा प्रश्न काही केल्या या आमच्या ‘बालकमंत्र्याला’ सोडवता येत नाही. कारण या भ्रष्टनाथ मलिदा खाणाऱ्यांसाठी चॉपर आहेत. हवाईमार्ग आहेत. रस्त्यावरून जायची वेळ आली तर नागरिकांना थांबवून यांच्या गाड्यांसाठी रस्ता मोकळा करणारे ट्रॅफिक कंट्रोलर आहेत. पण सामान्य माणसाचे काय? असा संतप्त सवाल राजू पाटील यांनी उपस्थित केला आहे.

# यंदाची बेस्ट पतपेढीची निवडणूक गाजणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दि बेस्ट एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि.च्या पंचवार्षिक निवडणूकीत यंदा राजकारण रंगणार आहे. आधीच राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे बंधूंनी एकत्र येत एक पॅनल तयार केलेले असताना आता ठाकरे बंधूंना आव्हान देण्यासाठी महायुतीनेही मोर्चेबांधणी केली आहे. आमदार प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, मंत्री नितेश राणे आणि माजी आमदार किरण पावसकर यांनी एकत्र येऊन एक पॅनल तयार केले आहे. त्यामुळे यंदा ही निवडणूक चुरशीची होणार आहे.



मुंबई महापालिकेची निवडणूक अद्याप जाहीर झाली नसली तरी सर्व पातळ्यांवर या राजकारणातील युती आणि आघाड्यांना सुरुवात झाली आहे. त्याचाच प्रत्यय बेस्ट उपक्रमाच्या कामगार पतपेढी निवडणुकीतही येऊ लागला आहे. बेस्ट उपक्रमाच्या कामगारांच्या पतपेढीची निवडणूक सोमवारी (दि.१८) होणार आहे. या निवडणुकीत ज्या पॅनलची सत्ता येते त्या कामगार संघटना बेस्ट उपक्रमात बलवान समजल्या जातात. त्यामुळे या निवडणूकीला महत्व आहे. महाराष्ट्रात सद्या ठाकरे ब्रँड चर्चेत आहे. बेस्टचे बहुतांश कामगार, पुढारी, युनियनचे पदाधिकारी बेस्टच्या बाहेर शिवसैनिक आणि महाराष्ट्र सैनिक म्हणून परिचित आहेत. कित्येक कर्मचारी हे दोन्ही पक्षाचे पदाधिकारी आहेत.

दरम्यान, ठाकरे बंधूंच्या पॅनेलची घोषणा झाल्यानंतर महायुतीनेही आपले दंड थोपटले आहेत. आमदार प्रविण दरेकर व प्रसाद लाड यांची श्रमिक उत्कर्ष सभा, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांची समर्थ बेस्ट कामगार संघटना आणि शिवसेना (शिंदे) पक्षाचे माजी आमदार किरण पावसकर यांची राष्ट्रीय कर्मचारी सेना यांनी एकत्र येऊन सहकार समृद्धी पॅनलची निर्मिती केली आहे. त्यामुळे यंदाची बेस्ट पतपेढीची निवडणूक प्रचंड गाजणार असल्याची चर्चा सर्वत्र होताना दिसत आहे.

# भरकटलेल्या पर्यटकांची गडावरून सुखरूप सुटका

**। शहापूर । प्रतिनिधी ।**

शहापूर तालुक्यातील प्रसिद्ध माहुली गडावर ट्रेकसाठी गेलेले मुंबईतील दोन युवक रणजीत झा (१९) आणि आमिर मलिक (२०) भरकटल्यामुळे अडचणीत सापडले होते. वाट चुकल्याची जाणीव झाल्यानंतर त्यांनी पोलीस हेल्पलाइनवर संपर्क साधला. शहापूर पोलिसांनी तात्काळ हेल्प फाऊंडेशनच्या जीवरक्षक दल शहापूर या पथकास मदतीसाठी पाचारण केले. जीवरक्षक दलाचे सदस्यांनी त्वरित मोहिम राबवत सायंकाळी अंधारात, पावसाळी हवामानात आणि कठीण चढणीतून युवकांचा शोध घेतला. अखेर सायंकाळी ७ वाजता दोघांशी संपर्क साधून त्यांना सुखरूपपणे खाली आणण्यात आले. साधारण पाच तासांच्या प्रयत्नांनंतर सर्वजण सुरक्षितपणे पायथ्याशी पोहोचले.

# एसटीची ‘स्मार्टकार्ड’ योजना बंद | कागदी पास सांभाळण्याची नामुष्की

**। गुहागर । प्रतिनिधी ।**

राज्य परिवहन महामंडळातर्फे कागदी ओळखपत्राऐवजी स्मार्टकार्ड उपलब्ध करून देण्यात आले होते. मात्र, ही योजना बंद पडली असून, प्रवाशांना जुन्या कागदी ओळखपत्रावरच प्रवास करावा लागणार आहे. कागदी पास खराब होणे, गहाळ होण्याची भीती असल्यामुळे स्मार्टकार्डसाठी मागणी जोर धरत आहे.




राज्य परिवहन महामंडळातर्फे विविध घटकातील प्रवाशांना सवलती देण्यात येतात. त्यामध्ये ६५ वर्षांपुढील ज्येष्ठ नागरिकांना तिकीटदरात ५० टक्के सवलत, ७५ वर्षांपुढील अमृत ज्येष्ठ नागरिकांना शंभर टक्के सवलत, अधिस्वीकृतीधारक माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, पत्रकार, विद्यार्थी यांना एसटीतून प्रवास करताना तिकीटभाड्यात सवलत देण्यात येते. सवलत घेणाऱ्या लाभार्थी प्रवाशांना कागदी ओळखपत्रा ऐवजी स्मार्टकार्ड देण्यात येत होते. परंतु, आता स्मार्टकार्ड योजनाच बंद पडल्यामुळे प्रवाशांना पुन्हा कागदीच पास वापरावे लागणार आहेत. कागदी पास खराब होणे, गहाळ होण्याची भीती असल्यामुळे स्मार्टकार्डसाठी मागणी जोर धरत आहे.

---

## पुणे महानगरचा १ लाख ३३ हजार कोटींचा आराखडा | मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासमोर महामेट्रोचे सादरीकरण

# वाहतूक कोंडी फोडण्यासाठी नव्याने प्रकल्प प्रस्तावित

**। पुणे । प्रतिनिधी ।**

**पुणे महापालिकेसह पुणे महानगर प्रदेशच्या परिसरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी नव्याने प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले आहेत. त्यात ३१२ किलोमीटर लांबीची मेट्रो आणि त्यात ८० किलोमीटर नवीन बस रॅपिड ट्रान्स्पोर्ट सिस्टीम मार्ग, ४६ किलोमीटर बस मार्ग, बारा टर्मिनलचा पुनर्विकास, १९ नवीन उड्डाण पूल असे सुमारे १ लाख ३३ हजार ५३५ कोटी रुपयांचे प्रकल्प आहेत.**



पुण्याची वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी यापूर्वी ‘पीएमआरडीए’ने एल अँड टी कंपनीच्या मदतीने ‘सर्वंकष वाहतूक आराखडा’ तयार केला होता. तो महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने (महामेट्रो) सुधारित करत त्यात काही शिफारशी केल्या आहेत. शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी त्याचे सादरीकरण केले. या आराखड्यामुळे शहर आणि परिसरातील वाहतुकीचा वेग वाढेल, असा दावाही करण्यात आला आहे. त्यात मालवाहतुकीसाठी पुणे महानगर प्रदेशमध्ये (पीएमआर) १४ ट्रक टर्मिनल, ७ लॉजिस्टक हब आणि २६ मल्टिमोडल ट्रान्स्पोर्ट हब तयार करण्याचा प्रस्ताव आहे. पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाला मेट्रो, रेल्वे आणि रस्ते या तिन्ही सार्वजनिक वाहतुकीच्या जाळ्यातून जोडण्याचेही नियोजन आहे.

### या आराखड्यातील प्रमुख शिफारशी

१) सध्या सुरू असलेल्या तीन मेट्रो मार्गांव्यतिरिक्त ३१२ किलोमीटरचे नवीन मेट्रो मार्ग आणि मेट्रो लाइट मार्गिकांची कामे.

२) ८०.५ किलोमीटरचा नवीन बस रॅपिड ट्रान्स्पोर्ट सिस्टीम (बीआरटीएस) मार्ग.

३) ४६.३ किलोमीटरचा हाय फ्रिक्वेन्सी बस मार्ग.

४) ‘पीएमपी’च्या ताफ्यात पुढील काळात नव्या ४ हजार आणि २०५४ पर्यंत ११ हजार ५६४ बसचे नियोजन.

५) ६४१ किलोमीटर लांबीचे नवीन बस मार्ग.

त्याचबरोबर ‘पीएमपी’च्या सध्याच्या बारा टर्मिनलचा पुनर्विकास आणि नवीन ११ टर्मिनलची निर्मिती तसेच सध्याच्या पाच आगारांचा पुनर्विकास आणि १५ नवीन आगार तयार करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. आंतरशहर दळणवळणासाठी सात आंतरराज्य बस टर्मिनलचा पुनर्विकास आणि पाच नवीन टर्मिनलचे बांधकाम करण्याचे नियोजित आहे.

> “पुणे शहरासह महानगराचा सर्वंकष गतिशीलता योजना आराखडा करताना २०५४चा विचार करून २ हजार ५५० चौरस किलोमीटर क्षेत्राचा समावेश करण्यात आला आहे. त्यासाठी १ लाख ३० हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. राज्य शासनाच्या मंजुरीसाठी आराखडा सादर करण्यात आला आहे.”
>
> **– श्रावण हर्डीकर,** व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो, पुणे

## निवडक



### मुलींकडून पोलिसांना रक्षाबंधन

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील नेरळ गावातील विद्या विकास शाळेतील मुलींकडून नेरळ पोलीस ठाण्यात पोलिसांना रक्षाबंधन करण्यात आले. विद्या विकास मंदिर प्राथमिक शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. राखी पौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांसाठी 'राखी मेकिंग ॲक्टिव्हिटी'चे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका विनया काकडे, दिपाली पवार, अर्चना पाटील, भारती पळसकर, सुप्रिया सदावर्ते, अर्चना भोईर, गायत्री बंडबे यांनी मेहनत घेतली.



### इनरव्हीलकडून रक्षणाची मागणी

**कर्जत :** इरनव्हील क्लब, कर्जत शाखेच्या वनीने रेल्वे पोलिस बांधवांना राख्या बांधून रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला. रेल्वे पोलीस बांधव रेल्वे प्रवास दरम्यान सर्वच प्रवाशांचे रक्षण करत असतात, याची जाण ठेवून इनरव्हील क्लब कर्जतच्या वतीने रेल्वे पोलीस ठाण्यात जाऊन रेल्वे पोलीस बांधवांना राख्या बांधण्यात आल्या. तसेच त्याच्याकडून महिलांचे रक्षण करण्याची मागणी यावेळी महिलांकडून करण्यात आली. याप्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणवीर सिंह, वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी खाडे, उपनिरीक्षक सतीश कांबळे, प्रवीण कड आदींसह पोलीस कर्मचारी तसेच एनरव्हील क्लबच्या अध्यक्षा शिल्पा दगडे, कश्यपी ठक्कर, संजीवनी घुमरे, उज्वला पाटील, सरस्वती चौधरी, उत्तरा वैद्य, मनिषा साबणे, ज्योत्स्ना शिंदे उपस्थित होत्या.



### टीबी फोरम कमिटीची सभा

**उरण :** पंचायत समिती उरण येथे गटविकास अधिकारी यांच्या दालनामध्ये टि बी मुक्त ग्रामपंचायत अभियाना अंतर्गत तालुकास्तरीय टीबी फोरम कमिटीची सभा घेण्यात आली. त्यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र इटकरे, महिला व बाल विकासचे काळे, खासगी वैद्यकीय अधिकारी डॉ. साठे, प्राथमिक आरोग्य केंद्र गव्हाणचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अब्दुल प्राथमिक आरोग्य केंद्र कोप्रोली चे वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता भगत, सर्व सीएचओ, औषध निर्माण अधिकारी थळे, आरोग्य सहाय्यक व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. सभेमध्ये पुढील चार महिन्यांमध्ये टीबी मुक्त ग्रामपंचायतचे सर्व टार्गेट पूर्ण करून घेण्याबाबत तसेच प्रत्येक उपकेंद्र व ग्रामपंचायत अंतर्गत टी.बी विषयी जन जागृती करीता करावयाच्या बाबींबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली. उपचारावरील रुग्णांना उपचार पूर्ण करून घेण्याबाबतचे नियोजन, आर्थिक व सामाजिक आधार देण्याबाबत संबंधित ग्रामपंचायत वर जबाबदारी देण्यात आली.



### जिंदाल स्कूलच्या विद्यार्थिनींचा राष्ट्रपती भवनात रक्षाबंधन साजरा

**अलिबाग :** साळाव येथील जिंदाल स्कूलच्या विद्यार्थ्यीनींना रक्षाबंधनाचा संस्मरणीय अनुभव देऊन गेला. या विद्यार्थ्यीनींना राष्ट्रपती भवन, नवी दिल्ली येथे प्रत्यक्ष राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना राखी बांधण्याची संधी लाभली. यावेळी राष्ट्रपती महोदयींनी विद्यार्थ्यीनींचे स्वागत करत रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. यात कनक ओसवाल हिचा विशेष समावेश होता. राष्ट्रपती भवनाला भेट देणे हा अभिमानास्पद आणि स्मरणीय अनुभव मानला जातो. भारताच्या समृद्ध वारसा आणि लोकशाही मूल्यांचे हे प्रतीक असलेले हे ठिकाण राष्ट्रीय इतिहासाशी जोडणारे तसेच अप्रतिम वास्तुकलेचा आनंद देणारे आहे. विशेष म्हणजे, कनक ही रायगड जिल्ह्यातील पहिली जैन मुलगी असल्याची नोंद झाली. तिला राष्ट्रपती भवनात जाण्याची संधी मिळवली. अल्पवयात मिळालेल्या या यशामुळे तीचे हे पाऊल जिल्ह्यातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- 'जन्नावार हॉस्पिटल' बायपास रोड चेंढरे-अलिबाग मध्ये नर्सची जागा (vacancy) आहे. Contact No 7798034509
- आमच्या येथे J.S.W. (जिंदाल) कंपनीचे जुने नवीन कलर कोटेड पत्र्याचे पत्रे मिळतील. संपर्क : बाबू सैय्यद, कोळीवाडा कस्टम ऑफिसच्या बाजूला. मो. ७७४४९२५१६६
- विकणे आहे- भिवपुरी रोड स्टेशन वन रूम किचन फ्लॅट कमी किंमतीत विकायचा आहे. पोद्दार कॉम्प्लेक्स, फोन ०७०४५२१९८६९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# स्मारकाकडे जाणारा रस्ता खडतर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील दोन हुतात्मा आणि असंख्य क्रांतिकारकांचे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत मोठे योगदान आहे. मात्र, हुतात्मा हिराजी पाटील यांच्या स्मारकाकडे जाणारा रस्ता विद्यमान खासदार-आमदार बनवू शकले नाहीत. त्यामुळे त्या ठिकाणी जाण्यासाठी खड्डेमय रस्त्यातून वाट काढत जावे लागत आहे, अशी टीका स्वातंत्र्यसैनिक भगत मास्तर यांचे चिरंजीव भरत भगत यांनी समाज माध्यमांवर आपले मत प्रदर्शित करताना केली आहे.



- विद्यमान आमदार, खासदारांचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष
- भगत मास्तरांच्या चिरंजीवाची टिका

कर्जत तालुक्यातील माणिवली गावातील क्रांतिकारक हिराजी गोमाजी पाटील हे १९४३ मध्ये ब्रिटिशांच्या गोळीबारात हुतात्मा झाले. त्यांचे स्मारक शासनाने माणिवली गावात उभे केले आहे. या हुतात्मा स्मारकात जाण्यासाठी नेरळ-कळंब रस्त्यावरील अवसरे आणि वरई या दोन गावातून रस्ते जातात. हे दोन्ही रस्ते सध्या खड्डेमय झाले आहेत. त्यामुळे स्मारकाकडे जाताना सर्वसामान्यांना वाट शोधत जावे लागत आहे. दरम्यान, या रस्त्यांबाबत स्वातंत्र्यसैनिक भगत मास्तर यांचे पुत्र भरत भगत यांनी ऑगस्ट क्रांती दिनी विद्यमान खासदार-आमदार यांच्यावर टीका केली आहे.

भरत भगत यांनी समाज माध्यमावर पोस्ट करत म्हटले की, माणिवली येथे हुतात्मा हिराजी पाटील स्मारकात सालाबादप्रमाणे शासकीय कार्यक्रम साजरा झाला. हा कार्यक्रम साजरा करताना ही खड्डेमय रस्त्याची बाब जनतेसह प्रशासनाच्या व लोक प्रतिनिधिंच्या निदर्शनास आणू दिली. त्यांच्या मतदार संघात हजारो कोटी रुपयांचा निधी खर्च होतो. परंतु, हुतात्मा स्मारकांकडे जाण्याऱ्या रस्त्यांकडे त्यांचे जाणिवपुर्वक दुर्लक्ष होत आहे. येथील जनतेने वेळोवेळी मतदानाचा हक्क बाजावून यांना आमदार-खासदार केले. तसेच, हे आमदार-खासदार २ जानेवारी व ९ ऑगस्ट रोजीच्या कार्यक्रमानिमित्ताने माणिवली येथील स्मारकाजवळ वर्षातून दोन वेळा येत असतात आणि नतमस्तक होतात. परंतु, त्यांना त्यागातून आणि बलिदानातुन देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्यांच्या स्मारकपर्यंत जाणारे रस्ते बनवता आले नाहीत, ही दुर्भाग्याची गोष्ट आहे.

ज्यांच्या बलिदानमुळे झालेले विद्यमान आमदार-खासदार या ठिकाणचे रस्ते बनवू शकले नाहीत यात दोष कुणाचा? लोकप्रतिनिधींचा, प्रशासनाचा की जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या सर्वसामान्य जनतेचा? असा सवाल भरत भगत यांनी उपस्थित केला आहे.

## पोयनाडमध्ये कर्करोग पूर्व तपासणी शिबीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथील हुलासिबाई विविध लक्षी जैन समाज हॉल व विठ्ठल रखुमाई मंदिर येथे टाटा मेमोरियल हॉस्पिटल खोपोली व मुंबई व जेएसडब्ल्यू फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कर्करोग प्रतिबंधात्मक विभागाच्या वतीने कर्करोग पूर्व तपासणी शिबिराचे आयोजन ४ ते ६ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. शिबिरामध्ये पोयनाड विभागातील ५०० पेक्षा अधिक लोकांनी आपली तपासणी करून घेतली आहे. तीन दिवसीय शिबिरामध्ये कर्करोगाची पूर्व तपासणी, कर्करोग प्रतिबंधक उपाय व उपचार याबाबत माहिती देण्यात आली. शिबिरामध्ये तंबाखूमुळे होणारे दुष्परिणाम व कर्करोगाची पूर्व तपासणी व निधान, महिलांमध्ये होणारा स्तनाचा कर्करोग, घसा व फुफ्फुसाचा कर्करोगाची तपासणी करण्यात आली. कर्करोगा विषयी नवा दृष्टिकोन प्राप्त झाल्याचा सूर आरोग्य यंत्रणेतील मान्यवरांनी व्यक्त केला. पोयनाड विभागातील लोकांनी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असल्याचे दिसून आले.



कर्करोगाची प्राथमिक लक्षणे आढळलेल्या रुग्णांची पुढील तपासणी टाटा मेमोरियल हॉस्पिटल मुंबई येथे करण्यात येणार आहे. शिबिरासाठी डॉ. भरती, डॉ. अर्चना, डॉ. मोनिका, डॉ. जान्हवी, प्रेमदीप गायकवाड सह संपूर्ण टीम मनोज जैन, मनीष जैन, चंद्रप्रकाश जैन, मनोज टेमकर यांनी आरोग्य तपासणीमध्ये सहभाग घेऊन मोलाचे सहकार्य केले तसेच जैन मंदिर ट्रस्ट, ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड, विठ्ठल रखुमाई मंदिर ट्रस्ट यांनी जागा उपलब्ध करून दिली बद्दल त्यांचे आयोजकांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

## पालीत आदिवासीदिनानिमित्त नृत्य आविष्कार

**। पाली । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुका आदिवासी कातकरी समाज संस्था तसेच सह्याद्री आदिवासी ठाकूर समाज संस्था यांच्या संयुक्त विद्यामानाने पाली शहरात शनिवारी (दि.९) ऑगस्ट रोजी हुतात्मा नाग्या कातकरी व हुतात्मा बिरसा मुंडा आणि महामानवाच्या प्रतिमेचे पूजन करून विविध कार्यक्रम राबवत जागतिक आदिवासी दिन दोन्ही समाजाच्या समाज भवनामध्ये सुधागड तालुका आदिवासी कातकरी समाज संस्थेचे चंद्रकांत वाघमारे आणि सह्याद्री आदिवासी ठाकूर समाज संस्थेचे गोविंद लेंडी यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला.

यावेळी आदिवासी बांधवांना शुभेच्छा देण्यासाठी शेकापचे जिल्हा चिटणीस सुरेशशेठ खैरे, शिवसेना उबाठा गटाचे जिल्हा संपर्कप्रमुख विष्णू पाटील, संदेश शेवाळे, परमानंद राइळकर, राम पवार, अशोक पवार, साधूराम साजेकर, यांनी उपस्थित राहून आदिवासी बांधवांना शुभेच्छा दिल्या.



## ऐनघर परिसरात वृक्षारोपण

**। सुकेळी । प्रतिनिधी ।**

नागरीकांमध्ये महसुल विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबत जागरुकता वाढावी, महसुली विभागाकडुन देण्यात येणाऱ्या सेवा नागरीकांपर्यत पोहचाव्या यासाठी १ ते १५ ऑगस्ट या महसुल सप्ताहकालावधीत राबविण्यात येत आहे. याच अनुषंगाने रोहा तालुक्यातील नागोठणे महसूल विभागातर्फे ऐनघर परिसरामध्ये रोहा नायब तहसीलदार उज्वला अंधेरे-भोईर व कलावती कोकळे यांच्या प्रमुख उपस्थितीत ऐनघर, हेदवली व तामसोली या गावांच्या हद्दीमध्ये विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

यावेळी दिलीप खंदारे, योगेश वारंडे, साळुंखे तळाठी, प्रकाश डोबळे, नामदेव वाघमारे, राजेंद्र कोकळे, अनिल लाड, महेश शिरसे, भालचंद्र वारगुडे, गजानन बोंडेकर, निळेश दहीबेंकर, यांच्यासह ऐनघर विभागातील ग्रामस्थ व महिला उपस्थित होते.

## को.म.सा.प.ची कार्यकारिणी जाहीर

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

कोकण मराठी साहित्य परिषद श्रीवर्धन शाखेच्या नवीन कार्यकारिणीची निवड प्रक्रिया शनिवार (दि.९) ऑगस्ट रोजी सार्वजनिक वाचनालय येथे सीमा रिसबूड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सीमा रिसबूड यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी प्रसाद जोशी यांची निवड करण्यात आली. नवीन कार्यकारिणीमध्ये नंदकुमार चितळे, प्रविता माने, पद्मजा कुळकर्णी, अनिता कांबळे, रोहिणी क्षीरसागर यांची तर सदस्यपदी आनंद जोशी, शर्मिला जोशी, अनघा चोगले, मनोज गुरव, एकनाथ कोसबे, उमेश आमले, सुनिल यादव यांची निवड करण्यात आली.



## सोगावमध्ये जातीचे दाखले वाटप

**। सोगाव । प्रतिनिधी ।**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त शनिवार (दि.९) ऑगस्ट रोजी सोगाव व चोरोंडे आदिवासीवाडीमध्ये आदिवासी बांधवांना मुनवली येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांनी प्लास्टिक चटया व जातीचे दाखले वाटप करण्यात आले.

घाडी हे गेली अनेक वर्षे आपल्या भागातील आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच आदिवासी बांधवांच्या विकासासाठी अनेक योजना व विविध प्रकारचे उपक्रम मोठ्या प्रमाणात राबवित आहेत.

यावेळी सुनिल थळे, समद कुर, लाईक कप्तान, सुचित थळे, सतिश घाडी, संतोष बांद्रे, सचिन घाडी, रुस्तुम कुर, सुधाकर ठकरूळ, दिलिप मोंढे, संजय अनमाने, प्रथम करमेळे, मनीष खाडे, शैलेश तिर्लोटकर, मुनावर कुर, रूपेश अनमाने, निकेश अनमाने, गितेश ठकरुळ, नितेश ठकरुळ, दिपक सूद, सुयोग अनमाने, महेश मुळे, प्रतिक अनमाने, अशोक मोंढे, रोशन पुजारी, रोशन अनमाने व सचिन घाडी मित्रमंडळाचे सर्व सदस्य व इतर मान्यवर तसेच आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुलुंडकरांना पडली रानभाज्यांची भुरळ

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासनाच्या कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा अंतर्गत रानभाजी महोत्सव २०२५- २६ चे आयोजन शनिवारी मुलुंड हायस्कूल मुलुंड-मुंबई येथे करण्यात आले होते. या रानभाजी महोत्सवाला मुलुंडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या रानभाजी महोत्सवात मुलुंडकरांना कोकणातील रानभाज्यांची ओळख करुन दिली. या रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन ठाणे कोकण विभागीय कृषी सहसंचालक बाळाजी ताटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी खा. मनोज कोटक, प्रकाश गंगाधरे, नंदकुमार वैती, संजय घुडे, उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर, कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.



## कृत्रिम बुद्धिमत्तेची कार्यशाळा

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालय उरणमध्ये एक दिवसीय कृत्रिम बुद्धिमत्ता यावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेस प्राचार्य प्रा. डॉ. वाल्मीक गर्जे, प्रा. डॉ.एम. जी. लोणे, प्रा. डॉ. पराग कारुळकर, प्रा. डॉ. अरुण चव्हाण, प्रा. रियाज पठाण, प्रा. पूजा गुप्ता, प्रा. विनिता तांडेल व इतर प्राध्यापक व महाविद्यालयातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यशाळेचा समारोप प्रा. हन्नत शेख यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

## तळा बसस्थानकाचे काम पूर्ण

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा बसस्थानकाच्या काँक्रीटीकरणाचे काम हे ठेकेदाराकडून युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.




बसस्थानका समोरील काँक्रीटीकरण, संरक्षक भिंत, शौचालय व त्यावर एक विश्रांती खोली असे सदर बांधकामाचे स्वरूप आहे. जुलै महिन्यात प्रत्यक्ष कामाला सुरुवात देखील झाली. परंतु, हे काम अत्यंत धिम्या गतीने सुरू होते. यामुळे गणेशोत्सवापूर्वी एसटी बसेस बसस्थानकात येतील की नाही अशी चिंता प्रवासी वर्गाकडून व्यक्त करण्यात येत होती. संबंधित ठेकेदाराकडून युद्धपातळीवर काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले. यामुळे येथील नागरिकांना दिलासा मिळाला. गणेशोत्सवापूर्वी एसटी बसेस बसस्थानकात येण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याने प्रवासींवर्गामधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

**पारंपरिक वेशभूषेत भव्य मिरवणूक | कोळी बांधवांनी केला अंबानदीला नारळ अर्पण**

# बेणसे-झोतिरपाड्यात नारळी पौर्णिमा उत्साहात

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

**रायगड सह कोकणात नारळी पौर्णिमेच्या सणाला विशेष महत्व आहे. सालाबादप्रमाणे बेणसे झोतिरपाड्यात नारळी पौर्णिमेचा सण अत्यंत उत्साही पारंपरिक व धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला.**

यावेळी नारळाची मिरवणूक काढून ढोल ताशा वाजवत व नाचत गाजत अंबा नदीवर येऊन विधीवत पुजेने नारळ अर्पण केले. येथील कोळी बांधव आपल्या उदरनिर्वाहासाठी पिढ्यानपिढ्या पूर्वापार नजीकच्या अंबानदीत मासेमारी करतात. या नदीवर आपली उपजीविका असल्याने दरवर्षी सालाबाद प्रमाणे श्रावण महिन्यातील नारळी पौर्णिमेला अंबानदीची पुजा करून नारळ अर्पण करतात. दर्याला, वरुणराजाला प्रसन्न करण्यासाठी कोळीबांधव श्रावण महिन्यातील पौर्णिमेला समुद्रामध्ये नारळ अर्पण करतात. नारळ अर्पण करताना तो दर्यात, समुद्रात टाकला जात नाही. तर, अत्यंत आदरपूर्वक अर्पण केला जातो. आपल्या कित्येक पिढ्या नारळी पौर्णिमेला पारंपरिक पद्धतीने दर्याला नारळ अर्पण करून आपल्या उपजीविकेला मासेमारी व्यवसायाला सुरुवात करतात. नारळ हे शुभ आणि पवित्र मानले जाते. त्यामुळे या दिवशी नारळ अर्पण करून वरुणदेवतेला प्रसन्न केले जाते आणि पुढचे वर्षभर मासेमारी सुरक्षित आणि यशस्वी होण्यासाठी प्रार्थना केली जाते. हा सण निसर्गाबद्दलची आपली कृतज्ञता व्यक्त करतो.




या पारंपरिक व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनात अशोक भोय, प्रमोद तरे, पांडुरंग भोय, नथुराम भोय, विष्णु भोय, दत्ता तरे, मोहन भोय, संतोष कोळी, संजय भोय, विजय भोय, दिलीप भोय, रिंकू तरे, महेंद्र तरे, प्रवीण कोळी, कमलाकर कोळी, भास्कर कोळी, धीरज कोळी, प्रवीण भोय आदींचा सहभाग व मार्गदर्शन मोलाचे ठरले.

नारळी पौर्णिमेच्या उत्सवात हितेश कोळी, भगीरथ भोय, नामदेव तरे, यशवंत कोळी, मंगेश भोय, प्रकाश भोय, नारायण भोय, साहिल तरे, योगेश तरे, विनोद भोय, दीपेश भोय, शैलेश चोरगे, सुनील कुथे, हरिश्चंद्र तरे, चोरगे सिद्धेश, आदेश कोळी, जय कोळी, निखिल तरे, नयन तरे, सुजल भोय, सोपान भोय, राहुल भोय, भार्गव सुरज भोय, नमित तरे, अथर्व तरे, निशांत तरे, पार्थ भोय, निशांत तरे, देवेश तरे, हितेश भोय अमोल भोय मंगेश भोय, स्वप्निल कुथे, परशुराम कोळी, भालचंद्र तरे, नरेश भोय, रघुनाथ तरे, जीवनभोय, सागर भोय, विशाल तरे, पुंडलिक कोळी, गणेश भोय, सदानंद तरे, अरुण तरे, प्रशांत तरे, नितीन पाटील, प्रज्योत पाटील, सुनील पाटील, एदिश कुथे, वासंती झोतिरपाडा बेणसे विभागातील कोळी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> नारळी पौर्णिमा सणामागे एक सुंदर धार्मिक आणि नैसर्गिक संकल्पना दडलेली आहे. पावसाळ्यात खवळलेल्या समुद्राच्या लाटांमुळे मासेमारी पूर्णपणे थांबलेली असते. या काळात समुद्राला शांत करण्यासाठी आणि त्याच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ही पौर्णिमा साजरी केली जाते.
> – प्रमोद तरे

# करंजा बंदरात ६०० कोटींचा मासळी बाजार

## वाढत्या निर्यातीमुळे करंजा बंदर ठरणार देशातील मासळी निर्यातीच नवे केंद्र



**। उरण । वार्ताहर ।**

**मासेमारीच्या नव्या हंगामाला सुरुवात झाली असून करंजा बंदरातील मासळी बाजाराला सुरुवात झाली आहे. या बाजारात गतवर्षी ५०० तर यावर्षी ६०० कोटींच्या मासळीची विक्रमी उलाढाल होण्याची अपेक्षा मच्छिमारांनी व्यक्त केली आहे. १ ऑगस्ट पासून सुरू झालेल्या मासेमारीच्या नव्या हंगामात घाऊक बाजारात २० बोटीतून आलेल्या दोन कोटींच्या मासळीची विक्री केली जात असल्याची माहिती करंजा मच्छिमार संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी दिली आहे. १५ ऑगस्ट २०२४ ला स्वातंत्र्य दिनी नव्याने निर्माण झालेल्या करंजा मच्छिमार बंदरातून मासळी विक्री सुरू झाली आहे. या दोन महिन्याच्या कालावधीत बंदरातून ५० कोटींच्या ५०० टन मासळीची निर्यात झाली होती. यात यावर्षी वाढ झाली आहे.**

करंजा बंदरातील मासळी ही मासळी अमेरिका, चीन थायलंड तसेच आशिया व युरोप खंडातील अनेक देशात निर्यात करण्यात येत आहे. तर दुसरीकडे मासळी बंदर आणि त्यावर आधारित विविध प्रकल्पांमुळे करंजा परिसरात विविध प्रकारच्या छोट्या-मोठ्या लघु उद्योगात वाढ होत चालली आहे.त्यामुळे येथील स्थानिक बेरोजगारांना बऱ्यापैकी रोजगारही उपलब्ध होऊ लागला आहे. मुंबईच्या ससून बंदराला पर्याय म्हणून उरणच्या करंजा येथे नवे मच्छिमार बंदर उभारण्यात आले आहे. त्यामुळे येथील मच्छिमारांना लाभ झाला आहे.

अरबी समुद्र किनाऱ्यावर द्रोणागिरी डोंगराच्या पायथ्याशी करंजा गाव सात पाड्यात वसलेले आहे.३० हजारांहून अधिक लोकसंख्या असलेल्या चाणजे ग्रुप ग्रामपंचायत कार्यरत आहे.१७ सदस्य असलेली सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे.प्रामुख्याने कोळी बांधवांचीच सर्वाधिक वस्ती आहे. यामुळे मासेमारी व्यवसाय करणे ओघाने आलेच. मोठ्या प्रमाणावर पारंपरिक पध्दतीने व्यवसाय करणाऱ्या मच्छिमारांमुळे राज्यातील सात सागरी जिल्ह्यातील सर्वात मोठे मच्छिमार करंजा गाव म्हणून ओळखले जाते.

राज्यातील सर्वाधिक सुमारे ६५० मच्छीमार बोटी याच करंजा गावात मासेमारी करतात. राज्यातील सर्वात मोठी मच्छिमार सहकारी संस्थांही करंजातच आहे. वार्षिक सुमारे १०० कोटींची उलाढाल असलेल्या या मच्छिमार संस्थेच्या माध्यमातून डिझेलमागे एक पैसा आणि बर्फाच्या विक्रीमागे एक रुपया विकास निधी वसुल करुन शाळा, हॉस्पिटलची उभारणी केली आहे. मच्छिमारांसाठी लागणारे साहित्य किफायतशीर दरात उपलब्ध करून देण्यासाठी दुकानही सुरू करण्यात आली आहेत.

अशा सर्वाधिक मासेमारी करणाऱ्या करंजा मच्छिमारांच्या शेकडो बोटी मासळी उतरविणे, विक्रीसाठी मुंबईतील एकमेव ससुनडॉक बंदराच्या आश्रयाला जात होते.त्यामुळे ससुनडॉक बंदरावरील वाढता ताण लक्षात घेऊनच करंजा येथेच उपयुक्त जागेत सुमारे ३०० कोटी खर्चाचे एक हजार मच्छिमार बोटी क्षमतेचे अद्यावत करंजा मच्छिमार बंदर उभारण्यात आले आहे. त्यामुळे हे करंजा बंदर हजारो मच्छिमारांसाठी वरदान ठरले आहे. यामुळे रोजगार, व्यवसायांची संधीही वाढत आहेत. याआधीच मच्छिमारांसाठी आवश्यक लागणारे साहित्य पुरविण्यासाठी जाळी, रंग, सामान पुरवठा करणारे हार्डवेअर, २०-२५ वर्कशॉप्स, जाळींची दुकाने आहेत.करंजा येथुन काही वर्कशॉप्समध्ये तयार करण्यात येणारे मच्छिमार बोटींसाठी लागणारे पंखे, टनट्युब, सॉफ्ट आदी यांत्रिक साहित्याला थेट विदेशातून मोठी मागणी आहे.

### स्थानिक युवकांनी सुरू केला निर्यात व्यापार

करंजा मच्छिमार बंदरावर आधारित उद्योग म्हणून येथील स्थानिक तरुणांनी दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वतः मासळी निर्यातीचा व्यवसाय सुरू केला आहे. या माध्यमातून निर्यातदारांसाठी मासळी खरेदी करून येथील मासळी जगातील विविध देशात निर्यात केली जात आहे.

### बाजारात उत्साह

करंजा बंदरात खोल समुद्रात मासेमारी करून आलेल्या बोटी नांगर टाकू लागल्या आहेत. त्यामुळे बोटीतून आलेली मासळी उतरवून ती घाऊक बाजारात विक्री केली जात आहे. त्यासाठी खरेदीदारानीही गर्दी केली आहे. दुसरीकडे मासेमारी बोटी पुन्हा एकदा रवाना करण्याची तयारी सुरू आहे.

### निर्यात मासळीचे प्रकार

मकोल, सुरमई, बांगडा, समुद्री कोळंबी व बगा (रिबन फिश) आदी प्रकारच्या मासळीची मोठ्या प्रमाणात निर्यात केली जात आहे.

# आर्थिक समावेशनासाठी रिझर्व्ह बँक आपल्या गावात

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जनधन खातेदारांसाठी री-केवायसी आणि केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री जनसुरक्षा योजनांची नोंदणी सुलभ करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. हे अभियान १ जुलै ते ३० सप्टेंबर दरम्यान राबवले जात आहे. जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक विजय कुलकर्णी यांनी खातेदारांना या शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ ३ जुलै रोजी जिल्हाधिकारी किशन जावळे व मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या उपस्थितीत झाला. शिबिरांमध्ये बँक ग्राहकांना रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार कमी रिस्क असलेल्या जनधन खात्यांचे री-केवायसी करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. री-केवायसी न केल्यास खाते निष्क्रीय होण्याची शक्यता असून, सरकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहावे लागू शकते. ग्राहकांना या शिबिरांत केवळ री-केवायसीच नव्हे, तर प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि अटल पेन्शन योजनेत नोंदणी करण्याची संधीही मिळणार आहे. अभियानाअंतर्गत ११ ऑगस्ट रोजी आगरी समाज विकास मंच, चिंचपाडा, पेण येथील ग्रुप ग्रामपंचायत सभागृहात विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे कार्यकारी निदेशक, क्षेत्रीय निदेशक तसेच विविध बँकांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


# आदिवासी महिला सक्षमीकरण योजनेचा भव्य शुभारंभ



**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या सर्वांगीण विकास आणि सक्षमीकरणासाठी राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजनेचा शुभारंभ जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाला.

यांप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आत्माराम धाबे, महिला व बालविकास अधिकारी (जि. प.) निर्मला कुचिक अन्य मान्यवर उपस्थित होते.

पेण प्रकल्पातील न्युक्लिअस बजेट २०२५-२६ अंतर्गत दोन सामूहिक योजना महिला बचत गटांना देण्यात आल्या. याशिवाय चार वैयक्तिक लाभार्थ्यांना थेट योजनेचा लाभ प्रदान करण्यात आला. यामुळे आदिवासी महिलांच्या आर्थिक स्वावलंबनास मोठी चालना मिळेल. याच कार्यक्रमात रक्षाबंधनाचा उत्सवही साजरा करण्यात आला. शासकीय आश्रम शाळा, कोळघर येथील विद्यार्थिनींनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच उपस्थित सर्व अधिकारी व मान्यवरांना राखी बांधून भावबंध दृढ केला. जिल्ह्यातील विविध भागांतील आदिवासी महिला भगिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत उपस्थिती दर्शवली.

# बोर्लीकरांची चिखलातून वाट

**। दिघी । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन शहरातील सिध्दी विनायक नगर येथील प्रमुख मार्गावर चिखल झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी पसरली आहे. पावसाळ्यात आपला जीव मुठीत घेवून रस्ता चिखलातून पार करणे धोकादायक बनले आहे.

बोर्लीपंचतन शहरामधून कोंडेपंचतन गावाला जोडणारा हा महत्त्वाचा रस्ता असून, शहराला पाणीपुरवठा करणारे धरण कोंडेपंचतन गावाशेजारी आहे. मागील दिवसात जलजीवन मिशन अंतर्गत धरणातून पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी रस्त्यावर खोदकाम करण्यात आले.

त्याचवेळी याच रस्त्याचे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत डांबरीकरनाचे काम देखील सुरू करण्यात आले. मात्र, दोन्ही कामातील घाईगडबडीत अपूर्ण कामाचा परिणाम रस्त्यावर झाला आहे.



पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण न झाल्याने सर्वत्र चिखल पसरला आहे. तोच चिखल तुडवत वाट काढताना पादचाऱ्यांना पाय घसरून दुखापत होण्याच्या घटनेत वाढ होत आहे. या रस्त्याची दुरुस्तीसाठी ग्रामपंचायत हतबल बनली आहे. जबाबदार अधिकाऱ्यांशी संपर्क करून सुद्धा नागरी सेवेकडे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांतून संताप व्यक्त केला जात आहे.

# ‘दहीहंडी उत्सव साजरा करताना नागरिक, मंडळांनी अटींचे पालन करा’



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

दहीहंडी उत्सव साजरा करताना नागरिक, मंडळांनी अटींचे पालन करा असे आवाहन न्हावा-शेवा बंदर विभागाचे नवनियुक्त सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर गायके आयोजित बैठकीत केले आहे.

दहीहंडी उत्सव निमित्ताने न्हावा -शेवा बंदर विभागाचे नवनियुक्त सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर गायके यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या आयोजित केलेल्या बैठकीस उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, दहीहंडी मंडळाचे पदाधिकारी,सदस्य व तालुक्यातील १७ पोलीस पाटील उपस्थित होते.

उपस्थितांना सर्व मंडळाने धर्मादाय आयुक्त यांच्याकडे दहीहंडी उत्सव मंडळाची नोंदणी करावी, प्रत्येक मंडळाने गोविंद पथकाचा आरोग्य विमा काढणे, प्रथमोपचार साहित्य व डॉक्टर यांचेसह ॲम्बुलन्सची व्यवस्था ठेवण्यात यावी, लहान मुलांना तीन थराच्या वरती दहीहंडी फोडण्यासाठी सामील करू नये तसेच त्यांच्या सुरक्षिततेबाबत दक्षता घ्यावी, शेवटच्या थरावरील गोविंदास सेफ्टी बेल्ट वापर करावा आदी सुचना पोलीसांनी केल्या. सुचनांचे तंतोतंत पालन करण्याचे आवाहन करून दोषी आढळल्यास कारवाई करण्यात येईल अशी तंबीही सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर गायके यांनी दिली.

## रिक्षा आणि कारची धडक

**पनवेल :** कारने रिक्षेला दिलेल्या धडकेत रिक्षा चालक जखमी झाला असून या अपघातात रिक्षा आणि कारचे नुकसान झाले. रवी लोहार हे नवीन पनवेल येथे राहत असून ते रिक्षा घेऊन पनवेल रेल्वे स्टेशन वरून रात्री बाराच्या सुमारास इंडियाबुल सोसायटी कोनगाव येथे गेले. पॅसेंजरला सोडून पनवेल रेल्वे स्टेशनकडे येत असताना रात्री दीडच्या सुमारास निसर्ग हॉटेलसमोर कोन येथे पाठीमागून वेगाने आलेल्या कारवरील चालकाने रिक्षाला ठोकर मारली. या अपघातात रिक्षाचालक रवी लोहार हे रस्त्यावर पडले. आणि त्यांची रिक्षा बाजूला असलेल्या वाहनाला धडकली.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ रायगड विभाग, पेण.

**निविदा सुचना क्रमांक ०५ सन २०२५-२६**

**(दुसरी मागणी)**

विभाग नियंत्रक ,रा.प.रायगड विभाग, हे रा.प.रायगड विभागातील महाड या बसस्थानकावरील प्रसाधनगृहाची स्वच्छता करून चालविण्यास देण्यासाठी "पैसे भरा,वापरा,व हस्तांतरीत करा "या तत्वावर अनुभवी नोंदणीकृत सार्वानिक संस्थाकडून दुसरी मागणी निविदा मागवित आहेत.

**निविदे संबंधीत तपशील**

निविदाकाराने सादर केलेले देकार निविदा उडल्याचे दिवसापासून १२० (एकशे वीस) दिवसापर्यंत ग्राहय राहतील. निविदाकारानी निविदेमध्ये भरावयाचा देकार अंकी व अक्षरी शाईमध्ये मराठी / हिंदी / इंग्रजी इत्यादी कोणत्याही एकाच भाषेत सुस्पष्टपणे लिहावीत. सशर्त निविदा नाकारल्या जातील.

निविदा संच पोस्टाने पाठविले अथवा स्विकारले जाणार नाहीत. कोणतीही अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न दाखविता कोणत्याही टप्प्यावर नाकरण्याचा हक्क विभाग नियंत्रक, रा.प. रायगड राखून ठेवत आहेत.

खालील कागदपत्रांची मूळ व झेरॉक्स प्रती सादर केल्यानंतर तसेच निविदा संचाची किंमत अदा केल्यानंतरच कोरे निविदा संच मिळू शकतील. तसेच खालील कागदपत्रे निविदा सादर करताना निविदासंचा सोबत जोडणे आवश्यक असेल.

१) सार्वजनिक संस्था ही सरकारमान्य नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
२) नोंदणीकृत दाखला वैध असला पाहिजे.
३) संस्थेस मागील दहा वर्षाचा सार्वजनिक शौचालय समाधानकारक चालविण्याचा अनुभवाचा दाखला आवश्यक आहे.
४) आयकर विवरण पत्र / सेल टॅक्स विवरण पत्र. [आर्थिक क्षमता तपासणीसाठी]
५) रुपये पन्नास हजार किंमतीची राष्ट्रीयकृत बँकेची सॉलव्हन्सी प्रमाणपत्र. [आर्थिक क्षमता तपासणीसाठी]
६) प्रसाधनगृहाच्या दैनंदिन देखभाल व स्वच्छतेसाठी लागणारे मनुष्यबळ असल्याचे दाखला / प्रमाणपत्र.
७) संस्थेकडे कुठल्याही प्रकारचे न्यायालयीन प्रकरण नसल्याचे हमीपत्र.

सॅनेटरी मार्टकडून प्रशिक्षण घेतलेली संस्थाना तसेच मेहत्तर / वाल्मीकी समाजाच्या नोंदणीकृत संस्थाना प्राधान्य दिले जाईल.

कोरे निवीदा संच मिळण्याचा कालावधी :- दि.११.०८.२०२५ ते १८.०८.२०२५ पर्यंत (सार्वजनिक/स्थानिक/रविवार सुट्टी सोडून) सोमवार ते शुक्रवार दुपारी १४:०० वा.पर्यंत व शनिवारी ११:०० वा. पर्यंत.

निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ :- दि.१८.०८.२०२५ रोजी दुपारी १५.०० वा. पर्यंत.

निविदा उघडण्याची तारीख :- दि. १८.०८.२०२५ रोजी दुपारी १५.३० वा. शक्य झाल्यास.

कराराचा कालावधी :- कामाचा कार्यादेश दिल्यापासून ते निविदेच्या देकारातील कालावधीप्रमाणे.

कोऱ्या निविदा / कोटेशन संचाची किंमत जी.एस.टी. सह प्रति संचास (परत न मिळणारी) :-

१) रु. ५००/- प्रति संच [नापरतावा]
[रु. ५००/- निविदा संचाची किंमत + रु. ९०/- विक्रीकर]

**निविदा स्विकारणे बाबतचा तपशील :-**

**निविदाकारांनी सादर केलेल्या निविदेपैकी यशस्वी व रा.प. महामंडळाच्या दृष्टीने फायदेशीर निविदा रा.प. महामंडळाच्या प्रचलित नियमानुसार रा.प. महामंडळाचे सक्षम प्राधिकारी स्विकारतील किंवा कुठलेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर निविदा नाकारण्याचे अधिकारही विभाग नियंत्रक,रा.प. रायगड विभाग यांना असतील.**

विभाग नियंत्रक,
रा. प. रायगड विभाग,पेण.

# वक्तृत्व स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा सन्मान

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा वैशवाणी समाज संघाचा कै. विकास गणपत मनोरे व कै. हरिभाऊ गोविंद चौधरी स्मृति पुरस्कृत जिल्हास्तरीय विद्यार्थी गुणगौरव सोहळा, वैश्यवाणी सेवाभावी संस्था चौक, येथील सभागृहात संपन्न झाला. संपूर्ण जिल्ह्यातून दहावी बारावी व पदवीधर फर्स्ट क्लास मध्ये आलेले १०१ विद्यार्थी व कै. मालती मधुसूदन पोटे व कै. बळीराम बापू वाणी स्मृति वक्तृत्व स्पर्धा आणि कै.वसंत लक्ष्मण वाणी स्मृती निबंध स्पर्धा विजेते २२ विद्यार्थी उपस्थित होते.

ऋतुजा पोटे, सिद्धार्थ आंग्रे, अमित शहाणे, यांनी आपल्या मनोगतातून समाजाच्या या प्रेरणादायी उपक्रमामुळे आमच्यामध्ये समाजाविषयीची कृतज्ञता निर्माण झाली अशी भावना व्यक्त केली. डॉ दीपक खाडे यांनी विद्यार्थ्यांना करिअर विषयी उत्कृष्ट मार्गदर्शन केले. याप्रसंगी युवक अध्यक्ष मनोज आंग्रे, महिला अध्यक्ष शामल आंग्रे, या कार्यक्रमाचे पुरस्कर्ते उदय मनोरे व चंद्रशेखर चौधरी, उपाध्यक्ष दत्ताभाऊ तांबोळी व राजेंद्र चौधरी यांनी मार्गदर्शन केले. अशोक भोपतराव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून समाजातील उपक्रम करताना प्रत्येक तालुक्यामधून अनेकांना प्रतिसाद मागावा लागतो, तो हवा तसा मिळत नाही. ही खंत व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कामाकरता आम्हाला केव्हाही साद घालावी आम्ही त्यांना प्रेरणा देण्यास तयार आहोत असे मत व्यक्त केले. मनोज आंग्रे यांनी विद्यार्थ्यांना केव्हाही अडचण असेल तर शिक्षण समितीमार्फत जरी आलात तरीही तुम्हाला योग्य ती मदत मिळेल असे आश्वासन दिले. याप्रसंगी सदस्य अजिंक्य चौधरी व प्राची दबके तसेच तुपगाव सदस्य सचिन साखरे यांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.


SARASWATI EDUCATION SOCIETY'S

**YADAVRAO TASGAONKAR POLYTECHNIC**

Approved by AICTE & DTE, Affiliated to MSBTE, Mumbai
At. Chandhai, Post-Nasrapur, Tal: Karjat, Dist: Raigad, Pin code: 410201
www.ytpolytechnic.com, principal.ytp@tasgaonkartech.com

**ADMISSION NOTIFICATION against Cap Vacancy (ACAP)**

**Applications are invited for Admission to Direct Second Year Diploma in Engineering (DSD) Against Cap Vacancy (ACAP) for various courses for academic year 2025-26.**

| Sr. No | Name of Course | Course Code | Vacant Seats |
|---|---|---|---|
| 1 | Civil Engineering | 328219110 | 35 |
| 2 | Computer Engineering | 328224510 | 30 |
| 3 | Electrical Engineering | 328229310 | 02 |
| 4 | Information Technology | 328224610 | 13 |
| 5 | Mechanical Engineering | 328261210 | 01 |

The schedule of admission procedure is as follows,

1) Issue of application form at Office: **09.00 am to 4.00 pm from 10th of August 2025 to 11th of August 2025.**
2) Submission of Completely filled application form: **10.00 am to 4.00 pm from 10th of August 2025 to 11th of August 2025.**
3) Display of Provisional Merit List on Notice Board and Institute Website: **03.00 pm on 12th August 2025.**
4) Sale of Admission form & Information Brochure: **09.00 am to 03.00 pm from 13th of August 2025 to 14th of August 2025.**
5) Reporting to the Institute by submitting completely filled admission form with relevant documents: **10.00 am to 05.00 pm from 13th of August 2025 to 14th of August 2025.**
6) Cost of Information Brochure with Admission form: **INR 200/- only.**

For any queries contact to 8149679293 / 7030896095

Sd/
Principal


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यांत येते की, खालील वर्णन केलेली जमीन मिळकत विद्यमान मालक यांचे मालकी, ताबेकब्जातील असल्याची ग्वाही विद्यमान मालकाने दिल्यावरुन त्यांचेकडून आमच्या खरेदीदारांनी खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे आणि तशा आशयाची बोलणी त्यांच्या व आमच्या खरेदीदारांच्या दरम्यान झाली आहे. सदरची खाली वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांना विद्यमान मालक श्री. अशोक गणू ठाकूर वगैरे यांनी दिला आहे. सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी खालील पत्त्यावर त्यांची हरकत लेखी नोंदवावी. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| मौजे | भुमापन क्र. | क्षेत्र | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| नारंगी ता. अलिबाग | ९३/१/क | क्षेत्र ०-३१-०० हे. आर. + पो. ख. ०-०७-०० हे. आर. एकुण ०-३८-०० हे.आर. | ६.१२ |
| नारंगी ता. अलिबाग | ९३/१/ब | क्षेत्र ०-३८-५० हे. आर. + पो.ख. ०-००-०० हे. आर. एकुण ०-३८-५० हे. आर. | ९.८१ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही वहिवाट, गहाण, दान, बक्षिस लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसाहक्क आदी कोणत्याही प्रकारे कायदेशिर हक्क व हितसंबंध असल्यास अगर सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून येणाऱ्या पंधरा दिवसांच्या आत खालील पत्त्यावर सही करणार यांचेकडे कळवावी. तशी कोणतीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बिनजोखीम आहे, असे समजून आमचे खरेदीदार सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमच्या खरेदीदारांवर बंधनकारक राहणार नाही, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. ११/०८/२०२५

सही/-
खरेदीदारांचे ॲडव्होकेट
**डॉ. ॲड. निहा अनिस राऊत**
''लब्बैक'' इस्त्राईल आळी.
पो. ता. अलिबाग, जि. रायगड
पिन नं. ४०२ २०१
मोबा. नं. ८३७८९६४३३३

## निवडक

### वीरेश, श्लोक, हितांश, सोहम बुद्धिबळ स्पर्धेत पाचव्या फेरीत

**पुणे :** शिक्षण विभाग (पुणे मनपा) आणि जिल्हा क्रीडा परिषद यांच्यातर्फे आयोजित सतरा वर्षांखालील मुलांच्या गटाच्या शालेय बुद्धिबळ स्पर्धेच्या पाचव्या फेरीत वीरेश शरणार्थी, श्लोक शरणार्थी, हितांश जैन, सोहम जठारने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय नोंदविले. .खराडी येथील विठोबा मारुती पठारे क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धे तील पाचव्या फेरीचे काही निकाल ..–ींहश्रशींळली ऊेळिपस: उत्तेजक चाचणीत गतवर्षी २६० भारतीय खेळाडू दोषी.वीरेश शरणार्थी (५ गुण, सिटी इंटरनॅशनल स्कूल) वि. वि. हर्षवर्धन वडगावकर (४ गुण, लेक्सिकॉन स्कूल), श्रेयस दिवेकर (४ गुण, अभिनव विद्यालय) पराभूत विरुद्ध श्लोक शरणार्थी (५ गुण, स. प. कॉलेज), रौनक जाखोटिया (४ गुण, संस्कृती स्कूल) पराभूत विरुद्ध हितांश जैन (५ गुण, कल्याणी स्कूल), प्रथमेश अनंतपूरकर (४ गुण, लेक्सिकॉन स्कूल) पराभूत विरुद्ध सोहम जठार (५ गुण), स्पर्श बत्रा (५ गुण) वि.वि. सिद्धांत श्रॉफ (४ गुण), आदित्य पाटील (४ गुण) पराभूत विरुद्ध शर्विन बडवे (५ गुण), सिद्धांत मगर (५ गुण) वि. वि. रन जॉर्ज (४ गुण) मिळवित पाचव्या फेरीत दाखल झाले.

### उत्तेजक चाचणीत २६० खेळाडू दोषी



**नवी दिल्ली :** गतवर्षात घेण्यात आलेल्या उत्तेजक चाचण्यांतून २६० भारतीय खेळाडू दोषी सापडले असल्याची माहिती राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या वेळी देण्यात आली. या गतवर्षातील ही आकडेवारी सर्वाधिक असण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय उत्तेजक प्रतिबंधक एजन्सी (नाडा)कडून २०२४ मध्ये ७,४६६ उतेजक चाचण्या घेण्यात आल्या. भारतात या चाचण्या आतापर्यंतच्या सर्वाधिक होत्या. २०१९ मध्ये २२४ चाचण्या या सर्वाधिक होत्या. जागतिक उत्तेजक प्रतिबंधक एजन्सी (वाडा) यांच्या अहवालानुसार २०२३ मध्ये भारतात सर्वाधिक २१३ जण उत्तेजक चाचणीत दोषी सापडले होते..गेल्या काही वर्षांत उत्तेजक चाचणीत दोषी सापडण्याचे भारतीय खेळाडूंचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे, याची कल्पना सरकारला आहे का, असा प्रश्न राज्यसभा खा. इम्रान प्रतापगढी यांनी विचारला. उत्तेजकमुक्त भारत करण्यासाठी आम्ही सरकार म्हणून पूर्ण प्रयत्न करीत आहोत, असे उत्तर क्रीडामंत्री मनसुख मांडविय यांनी दिले. २०२३ मध्ये उत्तेजक चाचणीत दोषी सापडलेल्या भारतीय खेळाडूंमध्ये ७६ जण थलेटिक्समधील होते. त्यानंतर वेटलिफ्टिंग (४३), कुस्ती (२९) आणि बॉक्सिंग (१७) अशी आकडेवारी आहे.

### कबीर, कियाराची आगेकूच

**पुणे :** अर्बेन जेटस् डब्ल्यू १८ इंडिपेन्डन्स कप जिल्हा सुपर ५०० रँकिंग बॅडमिंटन स्पर्धा २०२५ च्या तिसऱ्या दिवशी कबीर कुलकर्णी आणि कियारा साखरे यांनी प्रभावी कामगिरी करत आगेकूच केली. स्पर्धेच्या ११ वर्षांखालील मुलांच्या एकल गटात कबीर कुलकर्णीने तर १३ वर्षांखालील मुलींच्या एकल गटात कियारा साखरेने विजय मिळविला. पुणे डिस्ट्रिक्ट मेट्रोपॉलिटन बॅडमिंटन असोसिएशनच्या अखत्यारीत आयोजित या स्पर्धेच्या सर्व गटांतील सामने अधिक तीव्रतेने झाले. कबीर कुलकर्णीने अप्रतिम शांतता व संयम दाखवत निमित शिशोदियाचा पराभव केला. पहिला गेम चुरशीचा ठरला व अतिरिक्त गुणांपर्यंत गेला, परंतु कबीरने १९–१७ असा विजय मिळवला. या गतीवर स्वार होत, दुसऱ्या गेममध्ये त्याने आपल्या अप्रतिम स्ट्रोक्सची उधळण करत विजय आपल्या नावावर केला आणि पुढच्या फेरीत प्रवेश मिळवला..थेशप उीळलज्ञशीं: भारतीय ‘अ’ महिला संघाची ऑस्ट्रेलियाविरुद्ध दारुण हार.कियारा साखरेला अन्वी कुलकर्णी कडून जोरदार आव्हान मिळाले. पहिला गेम १३–१५ ने गमावल्यानंतर, कियाराने जबरदस्त पुनरागमन करत तिची रणनीती व लढाऊ वृत्ती दाखवत पुढील दोन गेम १५–१०, १५–९ ने जिंकले. तिच्या या कामगिरीने तिची मानसिक ताकद आणि दडपणाखाली खेळण्याची क्षमता अधोरेखित झाली.

### श्रेयश आशिया कप स्पर्धेसाठी



**मुंबई :** एकहाती सामना फिरवण्याची क्षमता असलेला मधल्या फळीतील फलंदाज श्रेयस अय्यर भारताच्या टी–२० आंतरराष्ट्रीय संघात पुनरागमनाच्या उंबरठ्यावर आहे. आगामी आशिया कप स्पर्धेसाठी (यूएई) या ३० वर्षीय खेळाडूला पुन्हा संधी देण्याची निवड समितीची तयारी असल्याची माहिती मिळाली आहे. अय्यरच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे त्याचे पुनरागमन निश्चित मानले जात आहे. अय्यरने शेवटचा टी–२० सामना डिसेंबर २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळला होता, तर फेब्रुवारी २०२४ मध्ये विशाखापट्टणम येथे इंग्लंडविरुद्ध त्याने शेवटची कसोटी खेळली होती. त्यानंतर तो एकदिवसीय स्वरूपातच संघाचा मुख्य घटक राहिला. २०२५ चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकताना त्याने पाच सामन्यांत २४३ धावा करून संघातील सर्वाधिक धावा करणारा खेळाडू म्हणून आपली छाप पाडली. आयपीएल २०२५ हंगामात पंजाब किंग्जकडून त्याच्या कामगिरीने त्याची किंमत अधिक वाढवली. मेगा लिलावात तब्बल २६.७५ कोटींना विकत घेतलेल्या अय्यरने नेतृत्वगुण, दबावाखाली आक्रमक फटकेबाजी आणि संयम यांचे उत्तम मिश्रण दाखवले होते. त्याचे पुनरागमन ही संघासाठी आनंदाची बाब असली तरी आशिया कपात भारताला ऋषभ पंतशिवायच खेळावे लागणार आहे. मॅचेस्टर कसोटीत इंग्लंडविरुद्ध खेळताना पंतच्या पायाच्या बोटाला फ्रॅक्चर झाले असून तो किमान सहा आठवडे मैदानाबाहेर राहणार आहे. त्यामुळे तो वेस्ट इंडीजविरुद्धच्या मालिकेतही खेळू शकणार नाही. सकारात्मक बाब म्हणजे त्याला शस्त्रक्रियेची गरज नाही, मात्र त्याची अनुपस्थिती भारताच्या खालच्या–मधल्या फळीत मोठी पोकळी निर्माण करू शकते.

# वयचोरी रोखण्यासाठी कठोर पाऊल

- क्रीडा संहिता धोरण होणार दाखल
- दंडात्मक कारवाईची तरतूद

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

खेळांमधील वयचोरी रोखण्यासाठी तयार करण्यात आलेली राष्ट्रीय क्रीडा संहिता (स्पोर्ट्स कोड) लवकरच धोरणाच्या रूपात लागू होणार असून, याअंतर्गत नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई अनिवार्य करण्यात आली आहे, तसेच खेळाडूंचे वय अचूक ठरवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित हाडांची तपासणी करण्याची तरतूद आहे. क्रीडा मंत्रालय पुढील आठवड्यात हा मसुदा मंत्रिमंडळाच्या मंजुरीसाठी पाठविणार आहे. मार्च २०२५ मध्ये ही क्रीडा संहिता जनतेच्या अभिप्रायासाठी ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली होती. ही प्रक्रिया पूर्ण झाली आहे, असे मंत्रालयाच्या सूत्रांनी सांगितले. ही क्रीडा संहिता १५ वर्षांनंतर



सुधारित करण्यात आली आहे आणि आता ती पुढील आठवड्यात मंत्रिमंडळासमोर ठेवली जाईल, त्याची अंमलबजावणी त्यास मंत्रिमंडळाची मंजुरी पुरेशी आहे, असे सूत्रांनी सांगितले.

जनतेकडून आम्हाला भरपूर सूचना मिळाल्या, त्यांचा सखोल विचार करण्यात आला;मात्रयावर्षीच्याप्रारंभिकमसुद्यातील बहुतांश बाबी तशाच राहतील, असेही सूत्रांनी सांगितले. भारतीय क्रीडाक्षेत्रात, विशेषतः युवा आणि ज्युनियर स्तरावर, वयचोरीचे प्रकार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. वैद्यकीय तपासणीची तरतूद असूनही, जास्त वयाचे खेळाडू स्पर्धेत उतरल्याचे अनेकदा आढळले आहेत.

**वय पडताळणीसाठी कागदपत्रे**

**सुधारित संहितेनुसारसर्व इच्छुक आणि नोंदणीकृत खेळाडूंना वय पडताळणीसाठी तीन कागदपत्रे द्यावी लागतील– जन्म प्रमाणपत्र, आधार कार्ड / मतदार ओळखपत्र / पासपोर्ट / पॅन कार्ड आणि शाळा सोडल्याचा दाखला / दहावीचे प्रमाणपत्र.**

# भारत दौऱ्यासाठी ऑस्ट्रेलियाचा संघ जाहीर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतीय क्रिकेट संघ ऑक्टोबर महिन्यात ऑस्ट्रेलियाचा दौरा करणार आहे. भारत ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्याची सुरुवात आशिया कप स्पर्धेनंतर होईल. भारताचा ऑस्ट्रेलिया दौरा १९ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर या दरम्यान सुरु राहील. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ३ वनडे आणि ५ टी २० सामने खेळणार आहे. मात्र, यापूर्वी ऑस्ट्रेलियाचा अ संघ भारताचा दौरा करणार आहे. ऑस्ट्रेलिया अ संघ भारत दौऱ्यात ४ दिवसांचे दोन कसोटी सामने आणि तीन एकदिवसीय सामने खेळणार आहे. यासाठी क्रिकेट ऑस्ट्रेलियानं अ संघाची घोषणा केली आहे. ऑस्ट्रेलिया अ संघात सॅम कोनस्टासला स्थान देण्यात आलं आहे. सॅम कोनस्टासनं जसप्रीत बुमराह सोबत पंगा घेतला होता. त्याला ऑस्ट्रेलिया अ संघात संधी मिळाली आहे.

**भारत ‘अ’ आणि ऑस्ट्रेलिया ‘अ’ वेळापत्रक**

ऑस्ट्रेलियाच्या ‘अ’ संघाचा भारत दौरा १६ सप्टेंबर पासून सुरु होऊन ५ ऑक्टोबरपर्यंत सुरु राहील. या दौऱ्यावर पाच सामने खेळले जातील. यामध्ये दोन कसोटी आणि तीन एकदिवसीय सामन्यांचा समावेश आहे. भारतीय ‘अ’ आणि ऑस्ट्रेलिया ‘अ’ यांच्यातील दोन कसोटी सामने लखनौ आणि कानपूरमध्ये होतील. तर, एकदिवसीय सामने कानपूरमध्ये होणार आहेत. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील मुख्य संघाची मालिका सुरु होण्यापूर्वी ‘अ’ संघांमधील सामने संपणार आहेत.

पहिली कसोटी मॅच: १६–१९ सप्टेंबर, कानपूर
दूसरी कसोटी : २३–२६ सप्टेंबर, लखनौ
पहली वनडे: ३० सप्टेंबर, कानपूर
दूसरी वनडे: ३ ऑक्टोबर, कानपूर
तीसरा वनडे: ५ ऑक्टोबर, कानपूर

**वनडेसाठी ऑस्ट्रेलियाचा ‘अ’ संघ**

**कूपर कोनोली, हॅरी डिक्सन, जॅक एडवर्ड्स, सॅम इलियट, जॅक फ्रेजर–मॅकगर्क, आरोन हार्डी, मॅकेंजी हार्वे, टॉड मर्फी, तनवीर संघा, लियाम स्कॉट, लॅची शॉ, टॉम स्ट्रॅकर, विल सदरलँड आणि कॅलम विडलर**

# दिव्यांगांची व्हीलचेअर स्पर्धेस प्रतिसाद




**| उरण | प्रतिनिधी |**

दिव्यांग बांधवांच्या अंगातील ताकद ही केवळ हातापायात नाही, तर ती त्यांच्या मनात, आत्म्यात, आणि जिद्दीत आहे. दिव्यांगत्व ही कमतरता नसून, ती एक वेगळी ओळख आहे, जी त्यांना इतरांपेक्षा खास बनवते. याचेच एक उत्तम उदाहरण उरण तालुक्यातील दिव्यांग बांधवांनी जगासमोर ठेवले आहे.

द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे मागील २५ वर्षा पासुन स्पर्धा घेत आहेत. यावर्षी पहिल्यांदाच उरण तालुक्यातील दिव्यांग बांधवांनी २५ व्या द्रोणागिरी वर्षा मॅरेथॉन २०२५ मध्ये व्हीलचेर रेसिंग स्पर्धेत सहभाग घेतला होता.

सदर स्पर्धा उरण तालुक्यामधील बोकडविरा–चारफाटा एन. एम. एस. ई. झेड. मैदान, पेट्रोल पंप जवळ रविवार (दि.१०) रोजी भरवण्यात आलेली होती. सदर स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक संदेश राजगुरू, द्वितीय क्रमांक मिल्टन मिरंडा, तृतीय क्रमांक गुलाम काझी, चौथा क्रमांक महेश पाटील आणि पाचवा क्रमांक उमेश पाटील यांनी पटकवला.

पहिल्यांदाच उरण तालुक्यातील दिव्यांग बांधवांना द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशन च्या २५ व्या मवर्षा मॅरेथॉनफ मध्ये सहभागी करून घेतल्याबद्दल उरण दिव्यांग सामाजिक संघटनेच्या सदस्यांनी आभार व्यक्त केले. त्याचबरोबर व्यासपीठावरील सर्व मान्यवरांनीही दिव्यांग बांधवांनी सदर स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांचेही कौतुक करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# न्यूझीलंडचा कसोटीत ऐतिहासिक विजय




**| बुलावायो | वृत्तसंस्था |**

वेगवान गोलंदाजांच्या भेदक मार्याच्या जोरावर न्यूझीलंडने यजमान झिम्बाब्वेचा दुसर्या कसोटी सामन्यात एक डाव आणि ३५९ धावांनी धुव्वा उडवला. क्वीन्स स्पोर्टस् क्लबवर झालेला हा सामना तिसर्याच दिवशी जिंकत न्यूझीलंडने दोन सामन्यांची मालिका २–० ने खिशात घातली. कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील हा तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा विजय ठरला आहे. न्यूझीलंडने आपला पहिला डाव ३ बाद ६०१ धावांवर घोषित केल्यानंतर, विजयासाठी डोंगरएवढे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या झिम्बाब्वेच्या फलंदाजांनी अक्षरशः नांगी टाकली. त्यांचा दुसरा डाव अवघ्या ३७.४ षटकांत ११७ धावांवर संपुष्टात आला. झिम्बाब्वेच्या डावाची वाताहतन्यूझीलंडच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच झिम्बाब्वेच्या फलंदाजांवर दडपण आणले. मॅट हेन्रीने डावाच्या तिसऱ्याच चेंडूवर ब्रायन बेनेटला शून्यावर बाद करत झिम्बाब्वेला पहिला धक्का दिला. बेनेटचा हा सामन्यातील दुसरा ङ्गडकफ होता. त्यानंतर हेन्रीने ब्रेंडन टेलरला स्लीपमध्ये झेल देण्यास भाग पाडले. जेकब डफीने शॉन विल्यम्सला स्वतःच्याच गोलंदाजीवर झेलबाद केले, तर मॅथ्यू फिशरने कर्णधार क्रेग इर्विनला बाद करत झिम्बाब्वेची अवस्था ४ बाद ३५ अशी केली..फोक्सचा दोन्ही डावांत भेदक मारायानंतर गोलंदाजीसाठी आलेल्या झॅक फोक्सने झिम्बाब्वेच्या मधल्या फळीचे कंबरडे मोडले. आपला पहिलाच कसोटी सामना खेळणार्या फोक्सने आपल्या भेदक गोलंदाजीने सर्वांना प्रभावित केले. त्याने एकामागोमाग एक ५ बळी घेत झिम्बाब्वेचा डाव गुंडाळण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने दुसर्या डावात ३७ धावांत ५ बळी घेतले, तर सामन्यात एकूण ७७ धावांत ९ बळी घेण्याची किमया केली. झिम्बाब्वेकडून तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या निक वेल्चने एकाकी झुंज दिली. त्याने नाबाद ४७ धावांची खेळी केली, पण दुसर्या बाजूने त्याला एकाही फलंदाजाची समर्थ साथ मिळाली नाही. न्यूझीलंडकडून पहिल्या डावात १५३ धावांची शानदार खेळी करणाऱ्या डेव्हॉन कॉन्वेला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले, तर मालिकेत एकूण १६ बळी घेणाऱ्या मॅट हेन्रीला मालिकावीर म्हणून घोषित करण्यात आले. या दणदणीत विजयामुळे न्यूझीलंडने जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत महत्त्वपूर्ण गुण मिळवले आहेत. हा विजय तिसरा सर्वात मोठा कसोटी इतिहासातील मोठा विजय आहे.

# मिचेल मार्श–ट्रॅव्हिस हेड ऑस्ट्रेलियाचे सलामीवीर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

पुढील वर्षी होणाऱ्या टी–२० विश्वचषकासाठी ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाने आपली सलामीची जोडी निश्चित केली आहे. कर्णधार मिचेल मार्श स्वतः स्फोटक फलंदाज ट्रॅव्हिस हेडसोबत डावाची सुरुवात करणार असल्याची अधिकृत घोषणा त्याने केली आहे. डेव्हिड वॉर्नरच्या निवृत्तीनंतर सलामीच्या जागेसाठी सुरू असलेला शोध या निर्णयामुळे संपला आहे. विशेष म्हणजे, २०२१ च्या टी–२० विश्वचषकात मार्शने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना संघाला पहिले विजेतेपद मिळवून देण्यात निर्णायक भूमिका बजावली होती. अंतिम सामन्यात तो प्लेअर ऑफ द मॅच ठरला होता. आता कर्णधार म्हणून तो स्वतः सलामीची जबाबदारी स्वीकारणार आहे.




मार्श आणि हेड यांनी आंतरराष्ट्रीय टी–२० मध्ये एकत्र सलामी दिली नसली तरी, एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्यांची जोडी अत्यंत यशस्वी ठरली आहे. त्यांनी ५ डावांमध्ये ७०.५० च्या उत्कृष्ट सरासरीने २८२ धावा केल्या आहेत. वॉर्नरच्या निवृत्तीनंतर ऑस्ट्रेलियाने मॅथ्यू शॉर्ट, ग्लेन मॅक्सवेल आणि जेक फ्रेझर–मॅकगर्क यांसारख्या खेळाडूंना सलामीला आजमावले होते, पण आता संघ व्यवस्थापनाने मार्श–हेड जोडीवर विवलास दाखवला आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी–२० मालिकेपूर्वी पत्रकारांशी बोलताना मार्शने संघाच्या भविष्यातील योजनेवर शिक्कामोर्तब केले. तो म्हणाला, भविष्यात मी आणि हेड संघासाठी डावाची सुरुवात करू. आम्ही एकमेकांना उत्तम जाणतो आणि एकत्र भरपूर क्रिकेट खेळलो आहोत. आमची वेव लेंथ उत्तम जुळते. त्यामुळे आम्ही सलामीला उत्तम योगदान देऊ शकतो. दरम्यान, मार्शने दुखापतीमुळे सध्या गोलंदाजी करणार नसल्याचेही स्पष्ट केले. सध्या मी गोलंदाजीपासून दूर आहे, पण हा निर्णय कायमस्वरूपी नाही. विश्वचषकापूर्वी आमच्याकडे तयारीसाठी पुरेसा वेळ आहे आणि आम्ही आमच्या खेळाच्या शैलीवर काम करत राहू, असेही तो म्हणाला.

### फुटबॉलपटू सुलेमान याचे निधन

**| गाझा | वृत्तसंस्था |**

पॅलेस्टाईनच्या राष्ट्रीय फुटबॉल संघाचा माजी कर्णधार सुलेमान अहमद जैद अल–ओबैद याचे वयाच्या ४१ व्या वर्षी निधन झाले आहे. गाझा येथे इस्रायलच्या हल्ल्यामध्ये हा फुटबॉलपटू मारला गेल्याची माहिती समोर आली आहे. इस्रायलचे पॅलेस्टाईनध्ये हल्ले सुरुच आहेत. या हल्ल्यात सुलेमान ओबैदचा मृत्यू झाला. पॅलेस्टाईन फुटबॉल असोसिएशननुसार, दक्षिण गाझा पट्टीत मदतीची वाट पाहताना त्याचे निधन झाले. सुलेमान पॅलेस्टाईन देशाचा पेले म्हणून चाहते ओळखत असत. पीएफएच्या माहितीनुसार, गाझाच्या खादमत अल–शाती क्लबचे माजी स्टार फुटबॉलपटू सुलेमान यांनी पॅलेस्टाईनसाठी २४ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत.

**चार शहरांमध्ये रंगणार लढती** | **२९ ऑगस्टपासून महासंग्रामास सुरुवात**

# प्रो कबड्डीचे वेळापत्रक जाहीर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

प्रो कबड्डी लीग १२ व्या हंगामाची सुरुवात २९ ऑगस्ट २०२५ रोजी विशाखापट्टणम येथे होणार आहे. हंगामात १२ संघ चार प्रमुख शहरांमध्ये साखळी फेरी खेळतील. विशाखापट्टणममध्ये सात वर्षांनंतर पुन्हा प्रो कबड्डीचा थरार पाहायला मिळणार आहे. प्रो कबड्डी स्पर्धा भारतातील लोकप्रिय स्पर्धांपैकी एक आहे. भारतीय हौशी कबड्डी महासंघाच्या मान्यतेने(एकेएफआय) होणाऱ्या या स्पर्धेचे आत्तापर्यंत ११ हंगाम यशस्वीपणे खेळवण्यात आले आहेत. आता १२ वा हंगामही लवकर सुरू होत असून या १२ व्या हंगामाच्या साखळी फेरीचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. ११ व्या हंगामाप्रमाणेच यंदाच्या हंगामातही ४ टप्प्यात सामने खेळवले जाणार आहेत. प्रो कबड्डीच्या ११ व्या हंगामाचा मानकरी ठरला हरियाणा स्टीलर्स संघ; पटणा



पायरेट्सला ३२–२३ फरकाने नमवलं. प्रो कबड्डी लीग(पीकेएल) स्पर्धेच्या १२ व्या हंगामाला २९ ऑगस्ट २०२५ रोजी विशाखापट्टणम येथे सुरुवात होणार आहे.

यंदाच्या हंगामातही एकूण १२ संघ विशाखापट्टणम, जयपूर, चेन्नई, दिल्ली या चार ठिकाणी होणाऱ्या टप्प्यांमधून विजेतेपदासाठी खेळणार आहेत. २९ ऑगस्ट रोजी विशाखापट्टणम येथील राजीव गांधी इंडोर स्टेडियममध्ये तेलगू टायटन्स विरुद्ध तामिळ थलायवाज आणि बेंगळुरू बुल्स विरुद्ध पुणेरी पलटण अशा ब्लॉक बस्टर लढतींनी स्पर्धेला सुरुवात होईल. विशाखापट्टमणलाच ३० ऑगस्ट २०२५ रोजी तेलगू टायटन्स संघ घरच्या मैदानावर युपी योद्धाज विरुद्ध आपला सलग दुसरा सामना खेळेल. त्याच दिवशी सायंकाळी होणाऱ्या दुसऱ्या लढतीत यु मुम्बा विरुद्ध गुजरात जायंट्स यांच्यात चुरस रंगणार आहे. ३१ ऑगस्टला सुपर संडे असून यादिवशी तामिळ थलायवाज विरुद्ध यु मुम्बा सामना रंगेल. तसेच गतविजेता हरियाणा स्टिलर्स बंगाल वॉरियर्स विरुद्ध नव्या मोसमाची सुरुवात करणार आहे. निसर्गसुंदर अशा या किनार पट्टीवरील शहर विशाखापट्टणममध्ये प्रो कबड्डी लीगचे सात वर्षानंतर पुनरागमन होत आहे. विशाखापट्टणम येथे २०१८नंतर पहिल्यांदाच ही स्पर्धा होत आहे. पीकेएल १२ स्पर्धेचा दुसरा टप्पा १२ सप्टेंबरपासून जयपूर येथील एसएमएस स्टेडियमच्या जयपूरमध्ये रंगणार आहे. पहिल्या दिवशी दोन वेळच्या विजेत्या जयपूर पिंक पँथर्स संघासमोर बेंगळुरू बुल्स संघाचे आव्हान आहे. दुसऱ्या लढतीत तामिळ थलायवाज विरुद्ध बंगाल वॉरियर्स आमने–सामने असतील. जयपूरमध्ये प्रो कबड्डीचा ऐतिहासिक १००० वा सामना २०२३–२४ मध्ये खेळवण्यात आला होता.

**सामन्याचे ठिकाण**

**प्रो–कबड्डी लीग १२ व्या हंगामात विशाखापट्टणम, जयपूर, चेन्नई आणि दिल्ली येथे सामने होणार आहेत. प्रो कबड्डी लीग १२ व्या हंगामात उद्घाटनाचा सामना तेलगू टायटन्स विरुद्ध तामिळ थलायवाज संघात होणार आहे.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१–२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग–email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग– email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए–५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२–२२८८४५३८.
■ **संस्थापक–संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)